रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १४१
www.ramprahar.com

शुक्रवार, ८ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कोकण विभागीय वक्तृत्व स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश/२
पनवेल महापालिकेकडून पाण्याचे नियोजन/३
चौक ग्रामीण रुग्णालयात अनेक पदे रिक्त/७

## 'इस्रो'कडून पुढील दोन वर्षांमधील मोहिमांचे नियोजन



**श्रीहरीकोटा** : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) या वर्षात अनेक ऐतिहासिक मोहिमा फत्ते केल्या. इस्रोने चांद्रयान-३ ही सर्वात मोठी चांद्रमोहीम फत्ते केली. त्यापाठोपाठ आदित्य-एल१ हे अवकाशयान सूर्याच्या दिशेने पाठवले. आता इस्रो आणखी काही मोहिमा फत्ते करण्याच्या तयारीत आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासावेळी इस्रोने २०२४ आणि २०२५साठी ज्या मोहिमा आखल्या आहेत याबाबत विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी माहिती दिली. यापैकी निसार आणि गगनयान मोहिमेची बरीच चर्चा होत आहे. गगनयान मोहिमेमधून मानव अवकाशात पाठवण्याची तसेच भविष्यात अवकाश स्थानक उभारले जाण्याची शक्यता आहे.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी

### बळीराजाशी संवाद साधत नुकसानभरपाईचे आश्वासन

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची गुरुवारी (दि. ७) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली.

नागपूर जिल्ह्यामध्ये जवळपास १२४ गावांना अवकाळीचा फटका बसला आहे. ८५२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून सर्वाधिक नुकसान मौदा तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे झाले आहे. धानासोबतच कापूस, तूर, संत्रा पिकांचे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांना भरपाईचे आश्वासन दिले.



#### 'शेडनेटसाठी विमा योजना तयार करण्याबाबत हालचाली सुरू'

राज्यातील अनेक भागांत अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी लावलेले शेडनेट उडून गेले. या शेडनेटचा कुठलाही विमा नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अशा संकटाच्या वेळी शेतकऱ्यांना आधार मिळावा यासाठी शेडनेटसाठी विमा योजना तयार करण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली. या मुद्यावर मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली असून त्यांनी शेडनेटसाठी स्वतंत्र विमा योजना तयार करता येईल का यासाठी पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. शेडनेटची किंमत जास्त असल्याने त्याच्या प्रिमियमचा भार सरकार व शेतकऱ्यांना उचलावा लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## अबोली रिक्षेबाबत सविस्तर आराखडा सादर करण्याच्या सूचना

**नागपूर** : महिलांसाठी रोजगाराची संधी निर्माण करणे आणि महिला सुरक्षा या उद्देशाने राज्यातील १० महानगरांमध्ये अबोली रिक्षा सुरू करणे व सॅनिटरी पॅडसंदर्भात सविस्तर आराखडा सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. या संदर्भात गुरुवारी (दि. ७) नागपूर विधानभवन येथे बैठक झाली.

या बैठकीस महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. या योजनेचा सविस्तर आराखडा सादर करण्याच्या सूचना देऊन उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, यामध्ये इलेक्ट्रिक व्हेईकल देण्याचा प्रस्ताव आहे. चांगल्या इलेक्ट्रिक




व्हेईकल तयार करणाऱ्या कंपन्यांची याबाबत माहिती घ्यावी. महिलांना फायदा होईल अशा प्रकारे प्रस्ताव तयार करावा अशा सूचनाही त्यांनी या वेळी केल्या.

मुंबई शहर, नवी मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे व कल्याण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती या महानगरांमध्ये अबोली रिक्षा सुरू करण्यात येणार आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना सॅनिटरी पॅड पुरवण्याबाबतच्या योजनेविषयीही चर्चा करण्यात आली.

### राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका

## महाअंतिम फेरीचे आज उद्घाटन

**सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती**



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. ८)होणार आहे.

पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणाऱ्या या महाअंतिम फेरीचे उद्घाटन सकाळी ८ वाजता होणार असून या वेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले तसेच भाजपचे पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजेश्री वावेकर प्रमुख पाहुणे म्हणून तर आदरणीय उपस्थिती म्हणून सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, माजी नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे यांची उपस्थिती असणार आहे.

यंदा या स्पर्धेचे दहावे वर्ष आहे. या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे इतरही पारितोषिके आहेत, तर यंदाच्या गौरव रंगभूमी पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धेचे मुख्य प्रायोजक टीआयपीएल, सहप्रायोजक निल ग्रुप, तर सोशल मीडिया प्रायोजक इट्स माजा डॉट कॉम आहे. तीन दिवसांत दर्जेदार अशा २५ एकांकिकांचा विनामूल्य लाभ घेता येणार आहे. त्यामुळे या स्पर्धेचा नाट्य रसिकांनी लाभ घ्यावा, **(पान २ वर..)**

#### अंतिम फेरीतील कलाकृती

व्हाइट लाईट ठाणे (अनोळखी), माणुसकी मल्टिपर्पज फाउंडेशन बुलढाणा (अनपेक्षित), अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नाशिक (अ डील), वसा नाट्यपरंपरेचा (काव काव), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर (असणं नसणं), फनकार क्रिएटीव्ह अहमदनगर (बोळवण), त्रिकुटालय थिएटर पनवेल (क्वीन ऑफ द नाईट), आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज नागठाणे (शहीद), स्वर्ण पटकथा क्राऊड (खुदिराम).

## निवडक

### आता महाभूमी संकेतस्थळावर डिजिटल स्वाक्षरीयुक्त उतारे

**पुणे :** महसूल विभागांतर्गत विविध सेवांसाठी भूमिअभिलेख खात्याने महाभूमी संकेतस्थळावर डिजिटल स्वाक्षरीयुक्त ७/१२ उतारा, आठ अ उतारे उपलब्ध करून दिले आहेत, तसेच ई-हक्क प्रणालीद्वारे वारस नोंदी, मयताचे नाव कमी करणे, बोजा कमी करणे किंवा चढविणे आदी आता महा ई-सेवा केंद्र, सेतू सेवा केंद्र किंवा आपले सरकार सेवा केंद्रातून अधिकृतरित्या घेता येणार आहेत.

### अंबरनाथमधील विद्यार्थ्याला अपहरण करून लुटले

**कल्याण** : अंबरनाथ येथील एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे तीन जणांनी अपहरण करून चाकूचा धाक दाखवून त्याच्याजवळील १६ हजार रूपये लुटले. नीरज भोलानाथ यादव (वय २०) असे अपहरण करून मारहाण झालेल्या मुलाचे नाव आहे तर विनायक मदने, विजय, आर्यन अशी आरोपींची नावे आहेत.



## पोलीस निवारा केंद्रामुळे गुन्हे कमी होण्यास मदत -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोलीस निवारा केंद्रामुळे कामोठे परिसरातील गुन्हे कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, असे प्रतिपादन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि. ६) केंद्राच्या उद्घाटनावेळी केले.

कामोठे सेक्टर ३६ येथे स्व. मितेश रविंद्र जोशी यांच्या स्मरणार्थ रविशेठ जोशी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे पोलीस निवारा केंद्र उभारण्यात आले आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी यांनी या केंद्रासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले. स्व. मितेश रवींद्र जोशी यांच्या स्मरणार्थ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामोठे शहर मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी यांच्या प्रयत्नाने कामोठे सेक्टर ३६ **(पान २ वर..)**

## आराम बसची उभ्या मालट्रकला धडक; ४३ जण जखमी

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर पेठ (ता. आंबेगाव) येथे गुरुवारी (दि. ७) पहाटे आराम बसने पुढे उभ्या असलेल्या मालट्रकला धडक दिली. झालेल्या अपघातात बसमधील ४३ प्रवासी जखमी झाले आहे.

जखमींवर प्राथमिक उपचार मंचर येथील उपजिल्हा रुग्णालय व गंभीर जखमींना पिंपरी चिंचवड येथील यशवंतराव चव्हाण हॉस्पिटलमध्ये नेण्याची व्यवस्था पोलीस व ग्रामस्थांनी केली. सर्व जखमी नेपाळचे यात्रेकरू भाविक आहेत. मालट्रक (एमपी ०९ एमएच ४२३१) हा पुण्याकडे जात असताना काही वेळ रस्त्याच्या कडेला उभा होता. मंचरमार्गे पुण्याच्या दिशेने आराम बस (एमएच १९ वाय ५४६५) जात होती. ट्रक उभा असल्याचे बसचालकाच्या लक्षात न आल्याने ट्रकच्या मागील बाजूस बसची धडक बसली. प्रवाशांनी आरडाओरडा केला. परिसरातील ग्रामस्थ व नागरिक मदतीसाठी धावून आले.

## साखरेपासून इथेनॉल निर्मिती करण्यावर बंदी

### दर नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या देशात साखरेच्या दरात वाढ झाली आहे कारण ऊसाच्या उत्पादनात घट झाल्याचा परिणाम दरांवर होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने जूनपासून ऊसापासून इथेनॉल निर्मितीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाबाबत अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे. या निर्णयानंतर देशांतर्गत बाजारपेठेतील साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, असे मानले जात आहे.



याबबात ग्राहक व्यवहार आणि अन्नपुरवठा मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग देशातील साखरेचे उत्पादन, विक्री आणि उपलब्धता यावर लक्ष ठेवतो. ज्यामुळे स्थिर किमतीवर साखरेची उपलब्धता सुनिश्चित होते. सरकारने २०२३-२४ या काळात साखर कारखान्यांना आणि डिस्टिलरींना साखरेच्या रसापासून इथेनॉल बनवू नये, असे आदेश दिले आहेत.

हा आदेश तत्काळ लागू झाला आहे, परंतु बी-हेवी मोलॅसेसपासून इथेनॉलचा पुरवठा करण्यासाठी तेल विपणन कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या आदेशांसाठी इथेनॉलचा पुरवठा सुरू राहणार आहे. या निर्णयाबाबत मंत्रालयाने पेट्रोलियम मंत्रालयालाही कळवले आहे.

## आजपासून वरसोलीच्या आंग्रेकालीन विठ्ठल मंदिराचा जत्रोत्सव

### पाच दिवस येणार भाविकांचा महापूर



**अलिबाग : प्रतिनिधी**

कार्तिकी एकादशीपासून जिल्ह्यात गावागावच्या देवस्थानच्या जत्रांचा हंगाम सुरू झाला आहे. शुक्रवार (दि. ८)पासून अलिबागजवळच्या वरसोली येथील आंग्रेकालीन श्रीविठ्ठल मंदिराच्या जत्रेला सुरुवात होत आहे. पाच दिवस चालणाऱ्या या जत्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आहे.

अलिबाग शहराला लागून असलेल्या वरसोली येथे ही यात्रा एकादशीपासून सुरू होते ती पाच दिवस चालते. येथील आंग्रेकालीन मंदिराचा जिर्णोद्धार अलिकडेच करण्यात आला. जत्रेत पाचही दिवस भाविकांची मोठी गर्दी होत असते. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी यात्रा कमिटी मेहनत घेत आहे. भाविक दुकानदारांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. कायमस्वरूपी १० शौचालयांबरोबरच फिरते शौचालयदेखील उपलब्ध करण्यात आले आहे. प्रकाश योजनेसाठी विजेची सुविधा देण्यात आली असून त्यासाठी महवितरणकडून अतिरिक्त कनेक्शन्स घेण्यात आली आहेत. सुविधा पुरवण्याची जबाबदारी वरसोली ग्रामपंचायतीची असते. त्यास अलिबाग नगरपालिकेनेही सहकार्य करण्याची दर्शवली आहे.

**जत्रोत्सव कोणत्या उद्देशाने आणि त्यांची क्रमवारी कोणी ठरवली याबद्दल साहित्यात उल्लेख सापडत नाही. ३००-३५० वर्षांपूर्वीचा इतिहास असलेल्या या यात्रांमध्ये काळानुरुप यात अमुलाग्र बदल झाले, मात्र भाविकांची श्रद्धा, भक्ती अधिकाधिक वाढत चालली आहे, असे दिसून येते.**
**-रमेश नाईक, मुख्य विश्वस्त, विठ्ठल-रखुमाई मंदिर वरसोली**

वरसोलीची जत्रा म्हणजे बच्चेकंपनीसाठी पर्वणीच असते. विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, मिठाईबरोबरच खेळण्यांची दुकाने, नवीन पाळणे, वेगवेगळे खेळ यांची रेचचेल असते. गृहिणींनाही घरगुती वापराच्या वस्तू खरेदी करता येतात. विविध धार्मिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास काकड आरती होईल. पहाटे अभीषेक झाल्यानंतर ५ वाजल्यापासून मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात येईल. दिवसभर भजन, कीर्तन असे कार्यक्रम असतील. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा कमिटीचे उपाध्यक्ष हर्षल नाईक यांनी केले आहे.



# माजी सैनिकांच्या कल्याणासाठी सर्वांनी योगदान द्यावे -राज्यपाल

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदल हे आपल्या देशाचा अभिमान असून देशाच्या संरक्षणाबरोबरच, नैसर्गिक आपत्तींच्या काळातही आपले सैन्यदल अत्यंत अमूल्य सेवा बजावते. भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण अर्पण केले अशा जवानांच्या कुटुंबीयांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करून त्यांचे जीवन सुसह्य होण्यासाठी,युद्धात अपंगत्व तसेच सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसना करिता सशस्त्र सेना ध्वज निधीला सर्वांनी जास्तीत जास्त योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.



राजभवन येथे मुंबई उपनगर आणि मुंबई शहर जिल्ह्यांद्वारे माजी सैनिकांच्या कल्याणासाठी आयोजित सन २०२३-२४ या वर्षीच्या सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलन मोहिमेच्या उद्घाटन कार्यक्रमात राज्यपाल रमेश बैस बोलत होते. भारतीय नौदलाच्या वेस्टर्न कमांडिंगचे मुख्य ध्वज अधिकारी व्हाइस ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी, जीओसी मुख्यालय महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा क्षेत्राचे लेफ्टनंट जनरल एच. एस. काहलॉन, एअर ऑफिसर कमांडिंग मुख्यालय मरीन एअर ऑपरेशन्सचे एअर व्हाइस मार्शल रजत मोहन या वेळी उपस्थित होते.

शासकीय, खासगी नामवंत व्यक्ती आणि संस्थांचे राज्यपाल रमेश बैस यांनी अभिनंदन करून गेल्या वर्षी सशस्त्र ध्वज दिन निधी संकलनाची उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आगामी वर्षातही यापेक्षा अधिक उत्कृष्ठ ध्वज दिन निधी संकलन करतील अशी अपेक्षा व्यक्त केली. भारतीय सैन्य हे त्यांच्या त्याग, आणि शौर्यामुळे ओळखले जाते. भारतीय सैन्यदल हे आपल्या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. आपल्या प्राचीन धर्मग्रंथांमध्ये एक प्रसिद्ध श्लोक आहे, ज्यामध्ये आपली माता आणि मातृभूमी ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे, असे म्हटंले आहे. आपल्या मातृभूमिला आणि आपल्या जनतेला सैनिक अत्यंत सुरक्षित वातावरण निर्माण करून देतात. त्यांच्यामुळे प्रत्येक व्यक्ती आणि आपले राष्ट्र प्रगती करू शकतो, असेही राज्यपाल म्हणाले.

या वेळी कोकण विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर, सैनिक कल्याण विभागाचे संचालक ब्रिगेडियर (निवृत्त) राजेश गायकवाड, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, सैनिक कल्याण बोर्डाचे मेजर प्रांजल जाधव यांच्यासह विविध देणगी देणाऱ्या शासकीय संस्था, शाळा, महापालिका, शासनाचे विविध विभाग आणि खासगी क्षेत्रातील संस्थांचे प्रतिनिधी आणि अधिकारी, नामवंत देणगीदार यांचा सन २०२२-२३ या वर्षात ध्वज दिन निधी संकलनाची उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### भारताची मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल

*आज आपल्या देशाने हे गतवैभव पुन्हा प्राप्त केले असून भारत जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, ही अत्यंत अभिमानीची गोष्ट आहे. जेव्हा आपण राष्ट्राप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवू आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात शिस्त पाळू तेव्हांच आपण आपले स्वातंत्र्य आणि आपली लोकशाही टिकवू शकतो. त्यामुळे या देशाला सर्वोत्तम सुरक्षा देणाऱ्या या शूरविरांच्या कुटूंबीयांसाठी सर्वांनी सशस्त्र सेना ध्वज दिनासाठी मदत करण्याचे आवाहन राज्यपालांनी केले.*

# 'सैनिकांसाठी ध्वजदिन निधी संकलन करणे हे देशकार्य'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आपल्या देशाचे रक्षण करण्यासाठी सैनिक कायम कार्यरत असतात. या सैनिकांच्या मदतीसाठी ध्वजदिन निधी संकलन करणे हे एक मोठे देशकार्य आहे. त्यामुळे आपण प्रत्येकाने यामध्ये आपला अधिकाधिक सहभाग द्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२३ संकलन कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

या वेळी निवृत्त कर्नल किशोर कुमार मोरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक गु.श. हरळय्या, जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, सहा.जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री. साळुंखे तसेच युद्ध विधवा, वीरमाता, वीरपिता, आजी-माजी सैनिक, पत्रकार आणि ध्वजदिन निधी संकलनाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केलेल्या विविध कार्यालयांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मागील वर्षी निधी संकलनात सहकार्य करणार्या शाळा, संस्था व शासकीय कार्यालयांच्या प्रतिनिधींचा भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.तसेच कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांना सशस्त्र सेना दिवसाचे बॅचेस लावण्यात आले आणि ध्वजदिन निधीत सहभाग देणाऱ्यांकडून निधी संकलित करण्यात आला.

या वेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक हरळय्या म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीत सैनिक आपले कर्तव्य करतो, आपले प्रमुख कर्तव्य म्हणून ध्वज निधी संकलनात सहकार्य करावे, रोजगार स्वयंरोजगार साठी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सहकार्य करण्यात येईल.

निवृत्त कर्नल किशोर कुमार मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहा. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री. साळुंखे यांनी केले.

# जॉबच्या बहाण्याने सव्वा लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पार्ट टाइम जॉब करून महिन्याला पंधरा ते वीस हजार रुपये कमवू शकता असे आमिष दाखवून एक लाख ११ हजार ४०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

करंजाडे सेक्टर २ येथील सरिता माधव मासाळ यांना इंस्टाग्राम वर महिन्याला पंधरा ते वीस हजार रुपये कमवू शकता असे नोटिफिकेशन प्राप्त झाले. त्यानंतर व्हाट्सअप वर तोच संदेश प्राप्त झाला. या वेळी लिंक पाठवून त्यात तुम्ही रजिस्ट्रेशन केल्यानंतर टास्क पाठवू, त्या टास्कमध्ये जाऊन तुम्ही रिचार्ज करा त्याबद्दल तुम्हाला नफा मिळेल असे नमूद केले होते. त्यानंतर टास्क खेळण्यासाठी २०० चा रिचार्ज करण्यास सांगितले. रिचार्ज केल्यानंतर त्यांना वेगवेगळ्या किमतीचे टास्क पाठवले. त्यांनी एक हजार रुपयेचा रिचार्ज केला असता त्या बदल्यात त्यांच्या खात्यावर दोन हजार १०० रुपये प्राप्त झाले. असे करता करता त्यांनी १ लाख ११ हजार रुपये भरले. त्यांनी टास्क पूर्ण केल्यानंतर त्या लिंक मध्ये असलेल्या खात्यात भरलेल्या एक लाख ११ हजार चारशे रुपयांच्या बदल्यात दोन लाख ४१ हजार ९०० रुपये दिसत होते. ते काढण्यासाठी लिंकमध्ये असलेल्या चार्ट वरील बटन दाबले असता रक्कम काढण्यासाठी टॅक्स म्हणून ४८ हजार ३८० रुपये भरा असे दिसत होते. त्यांनी टेलिग्रामद्वारे स्मिथ याच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ते पैसे भरण्यास सांगितले.

यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दोन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल व परिचालन प्रशिक्षण

## इच्छुक मच्छीमारांनी २० डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

मत्स्यव्यवसायाचा विकास आणि विस्तार होण्याच्या दृष्टीकोनातून, मत्स्यव्यवसायातील इच्छुक प्रशिक्षणार्थींना सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन, सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन हे सहा महिन्याचे प्रशिक्षण मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, वर्सोवा येथे देण्यात येते. या प्रशिक्षण केंद्रातून मत्स्यव्यवसाय, नौकानयनाची मूलतत्वे, सागरी डिझेल इंजिनाच्या निरनिराळ्या भागाची माहिती व दुरुस्ती, मासेमारीची आधुनिक साधने, प्रात्याक्षिक इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. सन २०२३-२०२४ मध्ये १ जानेवारी २०२४ ते ३० जून २०२४ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रशिक्षणसत्राचे आयोजन करण्यात येणार असून मच्छिमारांनी विहित अर्ज मच्छिमार सहकारी संस्थेच्या शिफारशीसह २० डिसेंबर २०२३ पर्यंत करावेत, असे आवाहन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी अ. ना. जावळे यांनी केले आहे.

सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन या १३१ व्या सत्राचे प्रशिक्षण, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र वर्सोवा, मुंबई उपनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी दारिद्र्यरेषेवरील प्रशिक्षणार्थी यांचेकडून ४५० रुपये आणि दारिद्र्य रेषेखालील प्रशिक्षणार्थीकडून १०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी हा क्रियाशील मच्छिमार व प्रकृतीने सुदृढ असणे आवश्यक आहे. तो १८ ते ३५ वयोगटातील असावा. प्रशिक्षणार्थीस पोहता येणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थी किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक असून मासेमारीचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थी बायोमेट्रिक कार्डधारक/आधारकार्ड धारक असावा. प्रशिक्षणार्थीच्या विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्जावर संबंधित मच्छिमार संस्थेची शिफारस असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थी दारिद्र्य रेषेखालील असल्यास, अर्जासोबत त्याबाबतचे प्रमाणपत्र, संबंधित गट विकास अधिकारी यांच्या दाखल्यांची साक्षांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

या प्रशिक्षणासाठी वरील निकषांची पूर्तता करणाऱ्या मच्छिमारांनी विहित अर्ज मच्छिमार सहकारी संस्थेच्या शिफारशीसह मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पांडुरंग रामले मार्ग, तेरे गल्ली, वर्सोवा, मुंबई- ६१ येथे २० डिसेंबर २०२३ पर्यंत करावेत. अधिक माहितीकरिता अशोक जावळे, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, वर्सोवा, मो.नं. ९८३३२६६२५१ आणि श्री. जयहिंद सूर्यवंशी, यांत्रिकी निर्देशक, मो. नं ७५०७९८८५५२ यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोकण विभागीय वक्तृत्व स्पर्धेत सीकेटी विद्यार्थ्यांचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण महर्षी कै. दादासाहेब लिमये यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. ५) गणेश बाळकृष्ण वडेर हायस्कूल व वसंतराव गणेशमल ओसवाल कनिष्ठ महाविद्यालय पाली सुधागड येथे झालेल्या कोकण विभागीय कनिष्ठ महाविद्यालयन वक्तृत्व स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे.

इयत्ता ११ वी वाणिज्य शाखेतील स्नेहा विनोद शिंदे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला तिला रोख १५०० रुपयाचे पारितोषिक व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर ११ वी कला शाखेतील सम्यक संदेश कांबळे याने उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला. सदर स्पर्धेत संपूर्ण कोकण विभागातून ३० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.





या दोन्ही विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त अन्नदान

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्यरात्री पनवेल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन त्यांना अभिवादन केले. त्यानंतर ते आपल्या कार्यकर्त्यांसमवेत दादर चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी गेले.



स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिवंगत मनोज भाई संसारे यांच्या प्रेरणेतून गेली ३४ वर्षे येणाऱ्या लाखो भीम भक्तांना पक्षाच्या वतीने मोफत अन्नदान करण्यात येत आहे. त्याचबरोबर पक्षाच्या वतीने मीनाताई ठाकरे यांच्या स्मारकाशेजारी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सागर भाई संसारे, अनिकेत संसारे, महाराष्ट्र प्रदेशचे महासचिव अशोक वाघमारे, मुंबई प्रदेशचे अध्यक्ष अमित हिरवे, नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख अरुण धिवर, मुंबई प्रदेश युवा अध्यक्ष सिद्धार्थ पेडणेकर, रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे, पेण तालुका अध्यक्ष अमित कांबळे, समाधान कांबळे, भारत दाताड या मान्यवरांनी या अभिवादन सभेमध्ये सहभाग घेतला होता.

याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या वतीने आणि मुंबई महापालिकेच्या वतीने येणाऱ्या लाखो भीम भक्तांचे अतिशय उत्कृष्ट सोय केल्याबद्दल सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल पक्षाच्या वतीने धन्यवाद देण्यात आले.

पान १ वरुन

## राज्यस्तरीय अटल करंडक स्पर्धेच्या आज महाअंतिम फेरीचे उद्घाटन

असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते व अटल करंडक स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ ठाकूर, अटल करंडक आयोजन कमिटी उपाध्यक्ष विलास कोठारी, स्पर्धा सचिव व सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी केले आहे.

## पोलीस निवारा केंद्रामुळे गुन्हे कमी होण्यास मदत -आमदार प्रशांत ठाकूर

येथील भूमी टॉवरसमोर पोलीस निवारा केंद्र सुरू झाले आहे. या केंद्राचे उद्घाटन कामोठे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी भाजपचे कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, समाजसेवक रवी गोवारी, भाजपचे कामोठे शहर चिटणीस हर्षवर्धन पाटील, युवा नेते हॅप्पी सिंग, उत्तर रायगड जिल्हा चिटणीस विद्या तामखेडे, महिला मोर्चाध्यक्ष वनिता पाटील, युवा मोर्चाध्यक्ष तेजस जाधव, छावा फाउंडेशनचे दामोदर चव्हाण, जयेंद्र जोशी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या पोलीस निवारा केंद्रासाठी विलास कलांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, समस्या बदलत असतात, मात्र ज्या वेळी शासन, प्रशासन, सर्वसामान्य जनता एकत्र येतात त्या वेळी या समस्या सुटतात. असेच एक सोल्युशन या पोलीस निवारा केंद्राच्या माध्यामतून मिळाले आहे, असे प्रतिपादन केले.

# सीकेटी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन; विद्यार्थ्यांचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्लिश मीडियम प्राथमिक विभागातर्फे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.



या प्रदर्शनात शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत जलचक्र, निमल शेल्टर, जलसिंचन, सोलर सिस्टीम, ग्लोबल वॉर्मिंग, रेन वॉटर हार्वेस्टिंग, ऊर्जा समस्या आणि व्यवस्थापन,चंद्रयान ३, प्रदूषण नियंत्रण, महाराष्ट्रातील किल्ले, मीन्स ऑफ कम्यूनिकेशन, दळणवळणाची साधने तसेच गणित विषयासह विविध विषयांवर प्रतिकृती बनवून विज्ञान प्रयोग सादर केले.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ओमकार सरदार यांच्यासह सीकेटी ज्युनिअर कॉलेजच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील, इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, इंग्रजी माध्यम प्राथमिक आणि पूर्व -प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी आदी उपस्थित होते.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या ओमकार सरदार यांनी सीकेटी विद्यालयाच्या इंग्लिश मीडियम प्राथमिक विभागाने आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनाचा उल्लेख करून समाधान व्यक्त केले. . विद्यार्थ्यांमधून भावी वैज्ञानिक तयार होण्यासाठी बालपणापासूनच वैज्ञानिक दृष्टीकोन असणे गरजेचे आहे, असेही नमूद केले.

हा विज्ञान प्रदर्शनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यसाठी सीकेटी इंग्लिश मीडियम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रीना थळे, बीना नायर, प्रिया नायर यांच्यासह इतर शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

या वेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिवसेंदिवस विज्ञानाच्या शाखा रुंदावत चालल्या आहेत. आजची पिढी हुशार आणि बुद्धिमान आहे. दिवसेंदिवस त्यांच्या बुद्धिमत्तेत अधिक प्रगल्भशीलता येत आहे. त्याचा योग्य वापर होण्याची गरज आहे. वैज्ञानिक स्पर्धेतून विद्यार्थ्यांना सतत जागृत ठेवले पाहिजे. त्यांच्यात विज्ञानाबाबत उत्सुकता निर्माण करण्याची जबाबदारी आम्हा शिक्षकांची आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा म्हणूनच विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केल्याचे निलिमा शिंदे यांनी स्पष्ट केले. शाळेचे विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांनी हे विज्ञान प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी केली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीना नायर यांनी केले.

# पनवेल महापालिकेकडून पाण्याचे नियोजन

## १५ जूनपर्यंत आठवड्यातील एक दिवस पुरवठा बंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलकरांना जूनपर्यंत पाणीपुरवठा सूरळीत करता यावा यासाठी पनवेल महापालिकेने पाण्याचे नियोजन करण्याचा निर्णय घेतला असून यापुढे आठवड्यातील एक दिवस जलकुंभाच्या क्षेत्रनिहाय पाणी पुरवठा बंद करुन नियोजन केले जाणार आहे. ८ डिसेंबर ते १५ जूनपर्यंत या दरम्यानचे हे नियोजन असून पालिकेने याबाबतची माहिती प्रसिद्धीपत्रकातून जाहीर केली. त्यामुळे पनवेलकरांना यापुढील सात महिने पाण्याची काटकसर करावी लागणार आहे.



पनवेलचा विस्तार होत असल्याने मागील अनेक वर्षांपासून पनवेलकरांना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई भासते. पूर्वाश्रमीच्या पनवेल नगर परिषदेचे स्वमालकीचे अप्पासाहेब वेदक जलाशयाची (देहरंग धरण) क्षमता ३.५ दश लक्ष घनमीटर एवढी असल्याने पनवेलकरांची तहान बारमाही भागविण्यासाठी लागणारे मुबलक पाण्याचा उपसा या धरणातून होऊ शकत नसल्याने महापालिका इतर प्राधिकरणांकडून पाणी उसनवारीने घ्यावे लागते. पनवेलकरांना ३२ दश लक्ष लीटर (एमएलडी) पाण्याची गरज आहे. देहरंग धरणातून १६ एमएलडी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून (एमजेपी) ११ एमएलडी आणि ५ एमएलडी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) पाणी घेऊन पनवेलकरांना पुरवठा केला जातो. एमजेपी आणि एमआयडीसीकडून पनवेलला मिळणाऱ्या पाताळगंगा नदीतून पाणी पुरवठा होत असताना आठवड्याच्या प्रत्येक रविवार व सोमवार या दिवशी कमी पाणी मिळतो. तसेच इतर वेळेतही विजेच्या तांत्रिक दरुस्तीची कामांसाठी व इतर दुरुस्तीच्या कामांसाठी शटडाऊन घेतल्याने वारंवार पनवेलला कमी पाणी पुरवठा होत असल्याने देहरंग धरणातून जास्त पाणी उपसा करुन शहराची तहान भागवावी लागते, परंतु अधिकचा उपसा सध्या केल्यास धरणातील पाणीसाठा उन्हाळ्यात संपून जाईल या भितीमुळे महापालिकेने धरणातील पाण्याचे नियोजन ८ डिसेंबरपासून केले असून पनवेल शहरामधील ९ विविध उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवड्यातून एक दिवस बंद ठेवण्याचा निर्णय पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंत्यांनी घेतला आहे.

### शहरात विभागानुसार या दिवशी होणार कपात

**शुक्रवारी :** मिडलक्लास सोसायटी, भाग १ व २, एस. के. बजाज
**शनिवारी :** तक्का गाव, नागरी वसाहतीमध्ये पाणी पुरवठा बंद राहील.
**रविवारी :** संपुर्ण पनवेलकरांना पाणी पुरवठा सूरळीत सुरू राहील.
**सोमवारी :** मार्केट यार्ड, भाजी मार्केट, पायोनिअर सोसायटी, ठाणा नाका, पटेलपार्क, जैन मंदिर, गणपती मंदिर, मामलेदार कचेरी, दत्तराज सोसायटी, साठेगल्ली, विरुपाक्ष मंदिर, धूतपापेश्वर कारखाना शहरातील बहुतांश परिसर
**मंगळवारी :** पटेल मोहल्ला
**बुधवारी :** एचओसी कॉलनी परिसर
**गुरुवारी :** ठाणा नाका परिसरात पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

# डॉ. आंबेडकरांना खारघर भाजपकडून अभिवादन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघरच्या वतीने भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ६७व्या महापरीनिर्वाण दिनांनिमित्त अभिवादन करण्यात आले. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, दिवे आणि मेणबत्त्या पेटवून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शिवाय बुद्ध वंदना म्हणून त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला.

कोकण दर्पणचे संपादक प्रो. संजय महाडिक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि त्यांची संघर्षगाथाही विस्तृतपणे सांगितली. सरचिटणीस दीपक शिंदे यांनी प्रास्ताविक केले तर खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी महामानव बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून कार्यक्रमाला सुरुवात केली.

या वेळी उपाध्यक्ष किरण पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, प्रदेश सोशल मीडिया सदस्या मोना आडवाणी, मंडल चिटणीस शैलेंद्र त्रिपाठी, अनिल साबणे,शोभा मिश्रा, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, शिक्षक सेलचे अध्यक्ष प्रो. संदीप रेड्डी सर, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष संदीप माघाडे, अश्विनी भुवड, निर्मला यादव, मीनाक्षी अंथवाल, सीमा खडसे, नंदा पानसरे, दुर्गादेवी, अक्षय लोखंडे, प्रवीण बेरा, सर्जेराव मेगाणे, अमन सिंग, अनिकेत पाटील, दिपक ठाकुर, सुनील कटके, उमाकांत बुलबुले, रोशन राय, प्रदीप खळे, अनिकेत शर्मा यांच्यासहित तथागत महाविहार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शशिराव दामोदर, सरचिटणीस रवींद्र माने, आर.पी.आय.भीम रत्न पुरस्कार विजेते जगताप साहेब, सुमित इंडस्ट्रीज चे उद्योजक दादाराव उदागे याशिवाय अनेक भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृत योजनेंतर्गत कामांची पाहणी

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून आणि केंद्र शासनाच्या २.० अमृत योजनेंतर्गत नौपाडा येथे करण्यात येणाऱ्या कामांची महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पाहणी करून आढावा घेतला.

पनवेल महापालिका क्षेत्रातील २९ गावांमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे केंद्र शासनाच्या अमृत योजना २.० अंतर्गत पाण्याची लाईन, सिव्हर लाईन, तसचे पाणी पुरवठा करण्याची व्यस्वथा करण्यात येणार आहे. या २९ गावांमध्ये नौपाडा गावाची समावेश असून या ठिकाणी सुरू असलेल्या कामांची



पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी पाहणी करून कामांचा आढावा घेतला.

संबधितांना आवश्यक त्या सूचना दिल्या. या वेळी माजी नगरसेवक गोपीनाथ भगत, माजी नगरसेविका अरुणा भगत, भाजप नेते प्रदीप भगत, संतोष भगत, गणेश भगत आदी उपस्थित होते.

# सोन्याची चेन चोरीस

**पनवेल :** पायी चालत जाणाऱ्या ५७ वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र असलेली सोन्याची चैन खेचून चोरटे पळून गेले आहेत. या प्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शशिकला राजे नायर या खारघर, सेक्टर १९ येथे राहत असून त्या मोठ्या मुलीचा मुलगा याला रामशेठ ठाकूर शाळेमध्ये सोडण्यासाठी पायी जात होत्या. त्यावेळी त्यांच्या पाठीमागून स्कुटीवर दोन अनोळखी व्यक्ती आले व त्यांच्या गळ्यातील २५ ग्राम वजनाची सोन्याची चैन खेचून ते तळोजेच्या दिशेने पळून गेले. या प्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



**कळंबोली : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त भाजपा कार्यालयामध्ये अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी कळंबोलीतील भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**उरण : बाजारपेठेतील श्रीजी कलेक्शन या कपड्यांच्या दुकानाचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. मालक रमेश ठक्कर यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, नरेकर फकरुद्दीन, रमेश ठक्कर, विनय ठक्कर, वत्सल ठक्कर, अभिषेख जैन, मनन पटेल, हितेश शाह, सूरज बिन, सिद्धार्थ सुर्वे, विजय दाते, डॉ. फरहान नेरेकर, जयश्रीबेन ठक्कर, भाग्यश्री ठक्कर, अजित भिंडे आदी उपस्थित होते.**





**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, युवा मोर्चाचे अभिषेक भोपी, रोहित जगताप, अक्षय सिंग आदी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये भीम अनुयायांना अन्न व पाण्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पनवेल तालुक्यातील आणि पनवेल शहरातील भिम अनुयायी दादर चैत्यभूमी येथे रेल्वेने दर्शनासाठी जाणाऱ्या भिम अनुयायी यांच्यासाठी शिवाजी नगर युवक मित्र मंडळ आणि तथागत मित्र मंडळ यांच्याकडून पाण्याच्या हौदा बाजूला रेल्वे स्टेशन रोड पनवेल येथे अन्नदान, पाणी, केळी, बिस्किटे वाटप करण्यात आले.



या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, माजी नगरसेवक अजय बहिरा, ज्येष्ठ नेते जगदीश घरत, रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, अनुसूचित जाती मोर्चा उपाध्यक्ष मधुकर उरणकर, ज्येष्ठ कार्यकर्ते श्याम साळवी, धनाजी वाहुळकर, किशोर वाहुळकर, दीपक वाहुळकर, रूपेश वाहुळकर, आनंद जाधव, राम येडे, अनिल साळवी, विजय झिरे, सर्जेराव साळवे, अमोल लहाने, राजु बिल्लाव, अनिल बोटे, सुनील सूर्यवंशी, अनंत वाहुळकर आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.





# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये आजपासून बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. ८) व शनिवारी (दि. ९) सकाळी १० ते ५.०० या वेळेत एमर्जींग ट्रेंडस् इन कॉमर्स अँड सायन्स या विषयावर दोन दिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

शुक्रवारी सकाळी १० वाजता परिषदेचा उद्धाटन सोहळा संपन्न होईल तसेच मुंबई मधील व वेगवेगळ्या राज्यातील संशोधक त्यांची नोंदणी करून घेतील. या परिषदेसाठी आलेल्या सर्व पाहुण्यांच्या स्वागतानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड कार्यक्रमाची प्रस्तावना (परिषदेचा विषय) करतील तसेच भारतातील व भारताबाहेरील प्रमुख वक्ते व सल्लागार मंडळाचे सदस्य संशोधना संदर्भात त्यांचे विचार प्रकट करतील तसेच २ ते ५.१५ यावेळेत संशोधक त्यांचे संशोधन लेख सादर करतील. शनिवारी सकाळी १० वाजता भारतातील व भारताबाहेरील प्रमुख वक्ते तसेच सल्लागार मंडळाचे सदस्य संशोधनाविषयी त्यांचे विचार मांडतील तसेच संशोधकांना मार्गदर्शन करतील तसेच ११.३० ते ३.०० या वेळेत संशोधक त्यांचे संशोधन लेख सादर करतील तसेच ३.०० ते ३.३० या वेळेत परिषदेचा समारोप होईल.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी मुंबईमधील व इतर वेगवेगळ्या राज्यातील वाणिज्य, कला व शास्त्र शाखेतील सर्व संशोधकांना या दोन दिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले आहे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी ही दोन दिवशी बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी होण्यासाठी खूप मेहनत घेत आहेत.



**पनवेल : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिवसानिमित्त पनवेल महापालिका क्षेत्रात २०२३ मध्ये जन्मलेल्या मुलींना सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ देण्याचा संकल्प करून स्वखर्चाने प्रत्येक बालिकेचे एक हजार रुपये भरून आमदार प्रशांत ठाकूर यांनी बालिकांचे नवीन खाते उघडले. त्या अनुषंगाने भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्या हस्ते बालिकांच्या पालकांकडे खाता पासबुक आणि खेळणी प्रदान केली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील आदी उपस्थित होते.**

# उरण येथे महापरिनिर्वाण दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

बोध्दजन पंचायत समिती शाखा उरण नंबर ८४३ व माता रमाई महिला मंडळ उरण बौध्दवाडी यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मंगळवारी (दि. ५) उरणमध्ये अभिवादन करण्यात आले.



या वेळी आमदार महेश बालदी, भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, कौशिक शहा राजेश ठाकूर, अध्यक्ष प्रकाश कांबळे, सचिव विजय पवार, सहसचिव रोशन गाढे, उपाध्यक्ष हरेश जाधव, खजिनदार अनंत जाधव, सह खजिनदार सुरेश गायकवाड, उपाध्यक्ष अखिलेश जाधव विनोद कांबळे, बौध्दचार्य महेंद्र साळवी, प्रमोद कांबळे, महिला मंडळ अध्यक्ष सुनिता सपकाळे, संगिता जाधव, करुणा भिंगावडे, उरण नगर परिषद मुख्याधिकारी समीर जाधव व सर्व नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय

# आपत्तीसज्ञता हवी

मिचॉन्ग चक्रीवादळामुळे पुन्हा एकदा नैसर्गिक संकटापुढे आपली शहरे किती दीनवाणी होऊ शकतात हेच अधोरेखित झाले आहे. जागतिक हवामान बदलांमुळे अकस्मात प्रचंड प्रमाणात होणारा ढगफुटीसदृश पाऊस, वारंवार येणारी चक्रीवादळे, पूर हेच चित्र जगभरात दिसते आहे. भारत देश तर तीन बाजूंनी समुद्राने वेढलेला असल्यामुळे चक्रीवादळांचा फटका आपल्याला अनेकदा अनुभवावा लागतो आहे. नैसर्गिक संकटांची वाढती तीव्रता पाहता भविष्यातील टोकाच्या नैसर्गिक आपत्तींचा विचार करूनच आता शहर नियोजन करावे लागणार आहे.

**मिचॉन्ग चक्रीवादळाने तामिळनाडूला पुन्हा एकदा २०१५च्या भीषण पूरस्थितीची आठवण करून दिली. या चक्रीवादळाच्या तडाख्याने सुरू झालेल्या जोरदार पावसाने सोमवारपर्यंत चेन्नई शहरासह आसपासचा बराचसा भाग पाण्याखाली बुडाला. अनेक तासांसाठी खंडित झालेला वीजपुरवठा, पाठोपाठ बंद झालेले इंटरनेट, रस्त्यांवरील पाण्यात तरंगणाऱ्या मोटारी आणि तशातच कुठेतरी रस्त्यावर फिरताना दिसलेल्या मगरी या साऱ्याने तेथील लोकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले होते. मंगळवारपर्यंत या चक्रीवादळाच्या तडाख्यात चेन्नईमध्ये १७ जणांचा बळी गेल्याचे स्पष्ट झाले. यातील किमान दहा जण हे पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने वा विजेच्या धक्क्याने दगावले. पुराच्या पाण्याने वेढलेल्या घरांमध्ये अडकलेल्या लोकांची सुटका करण्यासाठी मदतपथकांना बुधवारी बोटींचा वापर करावा लागला. कमरेएवढ्या पाण्यातून वाट काढत या पथकांनी लोकांना सुखरूप बाहेर काढले. हवाई दलाने हेलिकॉप्टरमधून या परिसरामध्ये अन्नधान्याची पाकिटे टाकली. मिचॉन्ग चक्रीवादळ अखेरीस मंगळवारी आंध्र प्रदेशात धडकले. तेथील हानी तुलनेने कमी दिसून आली. चक्रीवादळापूर्वीच्या पावसाने तामिळनाडूच्या किनारपट्टीला झोडपून काढल्याने २०१५च्या भीषण पुराच्या आठवणी जाग्या झाल्या. त्या भीषण संकटात जवळपास ३०० लोकांचा बळी गेला होता. या वेळीही पावसाचे प्रमाण इतके प्रचंड होते की, सांडपाण्याचा निचरा करणारी व्यवस्था अधिक चांगली असती तरी शहरात पूरस्थिती ओढवलीच असती असा दावा तेथील काही तज्ज्ञांनी आता केला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या 'मिचॉन्ग' या चक्रीवादळामुळे रविवार-सोमवारच्या ४८ तासांत चेन्नई आणि आसपासच्या परिसरात ४० सेंटीमीटरहून अधिक पाऊस झाला आणि अवघे चेन्नई शहर पाण्याखाली गेले. २०१५ मध्येही चेन्नईने भीषण पूरस्थिती अनुभवली होती. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठीची व्यवस्था त्यानंतर सुधारण्यात आली, परंतु त्याचाही आता काही उपयोग झाला नाही. एकीकडे अफाट वेगाने वाट्टेल तसे वाढणारे शहरीकरण आणि जागतिक तापमानवाढीमुळे बदलत चाललेले पावसाचे स्वरूप याचा फटका अलिकडच्या काळात देशातील अनेक शहरांना बसताना दिसला आहे. मुंबई शहराने तर याचा अनुभव अनेकदा घेतला आहे. कोलकाता, बंगलोरसोबतच पुण्यानेही अकस्मात अल्पकाळात कोसळणाऱ्या तुफानी पावसाचा फटका अनुभवला आहे. अगदी अलिकडच्या काळातच चक्क राजधानी नवी दिल्लीनेही पुराचा अनुभव घेतला. जागतिक तापमानवाढीचे प्रमाण कमी करण्याचे गांभीर्य एव्हाना जगभरातील तज्ज्ञांच्या लक्षात आले आहे, परंतु आता ते तितकेसे सोपे राहिलेले नाही. त्यामुळेच भारतासह अनेक देशांना याचा तडाखा अनुभवावाच लागणार आहे. प्रचंड मोठी किनारपट्टी लाभलेल्या भारत देशातील समुद्रकिनारची किमान डझनभर शहरे या शतकाच्या अखेरीपर्यंत पाण्याखाली जातील असा इशारा जागतिक स्तरावरील काही अहवालांनी यापूर्वीच दिला आहे. मुंबई, चेन्नई, कोलकाता या किनारपट्टीवरील महानगरांमधील पायाभूत सुविधांचे नियोजन करताना टोकाच्या नैसर्गिक आपत्तींसाठीची सज्ञता त्यामुळे आता विचारात घ्यावीच लागणार आहे.**

# ग्रामीण भागात कचऱ्याची समस्या होतेय गंभीर



रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरण वेगात होत आहे. त्याचबरोबर नागरीकीकरणदेखील झापट्याने होत आहे. विशेषतः उत्तर रायगडात नागरीकरण वेगात होत आहे. त्यामुळे हजारो टन कचरा जमा होत असतो. जिल्ह्यातील गावांमधील कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी वेळीच उपाययोजना केली पाहिजे.

रायगड जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती आहेत. यापैकी ६५०हून अधिक ग्रामपंचायतींकडे कचरा उचलण्यासाठी घंटागाड्याच उपलब्ध नाहीत. ते उचलण्यासाठी लागणारे मनुष्यबळही नाही. घंटागाड्या खरेदीसाठी आवश्यक निधीही उपलब्ध नाही. कचरा टाकण्यासाठी डंपिंग ग्राऊंडही उपलब्ध नाहीत. अशा अनेक समस्या सध्या ग्रामपंचायतींना भेडसावत आहेत.

जिल्ह्यातील नेरळ, ममदापूर, रसायनी, नागोठणे, गोरेगाव, चेंढरे, वरसोली, वेश्वी, थळ, नागाव, चौल यांसारख्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या काही हजारात आहे, मात्र त्या तुलनेत या ग्रामपंचायतींकडे कचरा व्यवस्थापनासाठी सक्षम यंत्रणा उपलब्ध नाही. जिल्हा परिषदेने कचराभूमी आणि कचरामुक्त गाव योजनेनुसार घनकचरा व्यवस्थापन करण्यात येणार असून यासाठी कंपोस्टिंग मशीन देण्यात येणार आहेत. यासाठी एक कोटी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, मात्र त्यातही जिल्हा परिषदेला समाधानकारक यश आले नाही.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग, उरण, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारयांवर असलेल्या ग्रामपंचायतींकडे स्वतःचे डंपिंग ग्राऊंड उपलब्ध नाही. त्यामुळे अनेक ग्रामपंचायती आपला कचरा किनारपट्टीवर मोकळ्या जागेत टाकतात, अन्यथा हा कचरा कांदळवन क्षेत्रात टाकला जातो. सिआरझेड कायद्यामुळे डंपिंग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध होत नाही. आता कांदळवन क्षेत्रही वनविभागाच्या अखत्यारीत गेल्याने त्या जागाही उपलब्ध होण्यास अडसर निर्माण होत आहे. त्यामुळे मिळेल त्या जागेवर कचरा टाकण्याचे प्रकार घडत आहेत. डंपिंग ग्राऊंड नसल्याने रस्त्याच्या बाजूलाच कचरा टाकण्याचे प्रकार घडतात. ही समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेने अनेक उपाय सुचवले, परंतु ही समस्या अद्याप कायम असून अनेक ठिकाणी कचऱ्याचो डोंगर उभे राहात आहेत. आजवर शहरी भागापुरते मर्यादित असलेली ही समस्या ग्रामीण भागातही डोके वर काढू लागली आहे. ग्रामीण भागात कचरा व्यवस्थापन करणे काही ग्रामपंचायतींसाठी डोईजड होऊ लागले आहे.



स्वच्छता अभियानात पुरस्कार मिळवलेल्या ग्रामपंचायतींमध्ये कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. दोन वर्षांपूर्वी अभियानादरम्यान या ग्रामपंचायतींनी स्वच्छता अभियान राबवले, परंतु स्पर्धा संपल्यानंतर तेथील स्थिती पूर्वीपेक्षा भयाण झाली आहे. गावाच्या प्रवेशद्वारावर ग्रामस्वच्छता पुरस्कार प्राप्त गाव असा फलक लावलेला आढळतो, मात्र आता त्याच शेजारी कचऱ्याचे ढीग दिसून येतात. संपूर्ण राज्यात प्लॅस्टिकबंदी किंवा प्लॅस्टिकचा वापर कमी करण्याबाबत अंमलबजावणी होत असताना रायगड जिल्ह्यात प्लॅस्टिकच्या पिशव्यांचे ढीग कमी झालेले नाहीत.

रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरण वेगात होत आहे. त्याचबरोबर नागरीकीकरणदेखील झापट्याने होत आहे. विशेषतः उत्तर रायगडात नागरिकरण वेगात होत आहे. त्यामुळे हजारो टन कचरा जमा होत असतो. औद्योगिकरणामुळे जल, वायू, ध्वनी प्रदूषण होतच आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. घनकचरा व्यवस्थापनाची समस्या जाणवू लागली आहे. अलिबाग नगरपालिकेच्या डंपिंग ग्राऊंडला मागील वर्षी लागलेली आग चार दिवस धुमसत होती. आताही येथील कचऱ्यांचा डोंगर दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. या डंपिंग ग्राऊंडच्या बाजूलाच कांदळवन असून डंपिंग ग्राऊंडमधून उडालेला कचरा खारपुटी झाडांच्या मुळावर जाऊन बसत आहे.

कचऱ्याचे सूक्ष्म पद्धतीने विघटन करण्यासाठी कठोर नियमावली असून ओला आणि सुका कचरा असा वेगवेगळा करून घेतला पाहिजे. यासाठी सातत्याने जनजागृती केली जाते. ग्रामपंचायतींना घंटागाडी, कचराकुंड्या दिल्या पाहिजेत. केवळ स्वच्छता अभियान राबवून ही समस्या सुटणार नाही.


त्यासाठी सातत्य ठेवावे लागेल. राज्य शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेऊन त्याची कडक अंमलबजावणी केली पाहिजे. अन्यथा ही समस्या भविष्यात अधिक बिकट होईल.



## बदलते तंत्रज्ञान

# सिमकार्ड खरेदी-विक्रीमध्ये होणार मोठे बदल

दूरसंचार विभागाने सिमकार्ड घेताना व्हेरिफिकेशनसाठी केवायसीच्या प्रत्यक्ष कागदपत्रांचा वापर बंद करणार असल्याचा निर्णय घेतला आहे.



नियम नवीन वर्षापासून म्हणजेच १ जानेवारी २०२४पासून लागू करण्यात येणार असून खरेदी-विक्री प्रक्रिया सुरळीत होणे, फसवणूक होऊ नये अशा सुरक्षेच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आलाय.

सध्या एखादे सिमकार्ड घेण्यासाठी तुम्हाला प्रत्यक्षात फॉर्म भरावा लागतो, फोटो चिकटवावे लागतात. त्यासोबतच ओळखपत्राचा व राहत्या जागेचा पुरावा अशी सगळी कागदपत्रे जमा करावी लागतात, परंतु नवीन वर्षापासून ही संपूर्ण केवायसी पद्धत डिजिटल पद्धतीने होणार आहे. वेळोवेळी केवायसी व्यवहारामध्ये विविध बदल केल्यानंतर आता ९-८-२०१२मधील नियमांमध्ये बदल करून ग्राहकांची ओळख ही प्रत्यक्ष कागदपत्रांचा वापर न करता केवळ डिजिटल पद्धतीने १ जानेवारी २०२४पासून केली जाईल असे समजते.

नवीन नियमानुसार बेकायदेशीर गोष्टींमध्ये झेड पॉईंट टु सेल एजंट्स सहभागी होऊ नये यासाठी त्यांना दूरसंचार सेवा प्रोव्हायडरसोबत अथवा परवानाधारकांसोबत ग्रीमेंट करावे लागेल. झेड एजंट्स जर अशा कोणत्या बेकायदेशीर गोष्टींचा भाग असल्याचे समोर आले, तर त्यांना १० लाखांचा दंड करण्यात येणार असून केलेले ग्रीमेंट तीन वर्षांसाठी टर्मिनेट करण्यात येणार आहे.

एखादे नवे सिमकार्ड विकत घ्यायचे असल्यास किंवा चालू असणाऱ्या नंबरवरून नवीन सिमकार्ड घ्यायचे असल्यास डेमोग्राफिक माहिती देणे आवश्यक आहे. ही माहिती सिमकार्ड घेणाऱ्या व्यक्तीच्या आधारकार्डवर असणाऱ्या क्युअर कोड स्कॅन करून घेण्यात येणार आहे.


जुन्या वापरकर्त्याने एखादा नंबर बंद केल्यानंतर ९० दिवसांनी तो नवीन वापरकर्त्याला देण्यात येईल. सिमकार्ड बदलण्यासाठी वापरकर्त्याला संपूर्ण केवायसी प्रक्रियेतून जावे लागणार असून इनकमिंग आणि आउटगोइंग एसएमएस प्रक्रियेवर २४ तासांचा बार राहणार आहे. सरकारने डिजिटल फ्रॉड/फसवणूक होऊ नये यासाठी बल्कमध्ये केल्या जाणाऱ्या सिमकार्ड विक्रीवर बंदी घातली आहे, परंतु तुम्हाला जर व्यवसायासाठी किंवा कामासाठी जास्त सिमकार्ड्स घ्यायचे असल्यास प्रत्येक सिमकार्ड वापरकर्त्याला केवायसीचे नियम लागू होतील. दरम्यान, ग्राहक एका आयडी कार्डवर नऊ सिमकार्ड विकत घेऊ शकतात.

# नर्तक व नृत्य दिग्दर्शक उदय शंकर

जागतिक कीर्तीचे भारतीय नृत्याकार उदय शंकर यांचा जन्म ८ डिसेंबर १९०० रोजी पूर्वीच्या कलकत्ता येथे झाला. वयाच्या अठराव्या वर्षी चित्रकलेच्या अभ्यासासाठी ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी केलेले नृत्याचे काही कार्यक्रम पाहून जगद्विख्यात रशियन नर्तिका आन्न पाव्हलॉव्ह प्रभावित झाली आणि तिने उदय शंकर यांना नृत्यकलेसाठी प्रवृत्त केले.

पाव्हलॉव्हच्या पथकाबरोबर उदय शंकर यांनी विविध देशांचा दौरा केला. दीड वर्षानंतर ते पॅरिसला आले. तेथे त्यांनी वेगवेगळ्या विशेषतः अतिपूर्वेकडील संस्कृतींचा आणि कलांचा सखोल अभ्यास केला. नृत्याचे अनेक कार्यक्रम पाहिले. या निरीक्षणातून त्यांची कला आकार घेत होती. त्यानंतर ते इंग्लंडमध्ये आले. मादाम सिमकी या आपल्या फ्रेंच शिष्येबरोबर त्यांनी स्वतंत्र कार्यक्रम सुरू केले. परदेशात असताना त्यांनी भारताला वारंवार भेटी दिल्या आणि भारतीय नृत्याचा व्यासंग वाढवला. भारतीय लोकनृत्यांची त्यांना विशेष आवड आहे. स्वतःच्या नृत्यशैलीला समुचित पदलालित्य आणि मुद्राभिनय यांची जोड देऊन ही कला त्यांनी पाश्चात्यांसमोर आणली. 'उदय शंकर म्हणजेच भारतीय नृत्य'असे समीकरण पाश्यात्य देशांत रूढ झाले.

भारतात आल्यानंतर (१९३८) अलमोडा येथे उदय शंकर यांनी इंडिया



**निमित्त**

कल्चर सेंटरची स्थापना करून अभिजात भारतीय नृत्ये शिकण्याची सोय केली. त्यांच्या लेबर अँड मशिनरी, द हिंदम ऑफ द लाइफ, सामान्यक्षती यांसारख्या बॅलेंनी अमाप लोकप्रियता मिळवली. नृत्यांच्या कार्यक्रमात नावीन्यपूर्ण कल्पना, रंगमंचाचा चातुर्यपूर्ण वापर आणि धंदेवाईक सफाई या गोष्टी यांनी आणल्या. त्यांचे विषय सद्यःस्थितीशी निगडीत असत. कार्यक्रमांची आखणी योजनाबद्ध असे, तसेच निर्मितिमूल्येही उच्च दर्जाची असत. कुठल्याही एका नृत्यप्रकाराशी एकनिष्ठ न राहिल्याचा व शास्त्रोक्त नृत्यात स्वतःच्या कल्पनांनुसार बदल केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. पाश्चात्य आणि पौर्वात्य नृत्यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. अतिपूर्वेची नृत्ये आणि युरोपातील अभिव्यक्तिवादी संप्रदायाचा या संदर्भात विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो, पण यामुळे त्यांचे नृत्य हिणकस न होता त्याला स्वतःचे असे आगळे वैशिष्ट्य प्राप्त झाले होते. पारंपरिक नृत्यांद्वारे आधुनिक समस्यांचा अर्थपूर्ण आविष्कार करण्याचे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी आवश्यक ती प्रयोगशीलताही त्यांच्यापाशी होती. तिमिर बरन या संगीतज्ञाच्या मदतीने त्यांनी नृत्याच्या संगीतातही आमूलाग्र बदल घडवले. भारतीय परंपरेला सर्वस्वी नवीन असलेली, मोठा वाद्यवृंद वापरण्याची कल्पना त्यांनी अमलात आणली, पण हे प्रयोग करीत असताना त्यांनी भारतीय नृत्याचा आत्मा कधी गमावला नाही. त्यांनी स्वतःची वेगळी अशी नृत्यशिक्षणपद्धती सुरू केली. याच पठडीतून त्यांची पत्नी अमला शंकर तसेच शांतिवर्धन, सचिन शंकर, कामेश्वर, जोहरा सैगल, नरेंद्र शर्मा यांसारखे कलावंत निर्माण झाले. सुप्रसिद्ध सतारवादक रवि शंकर त्यांचे बंधू होत. १९५९मध्ये उदय शंकर यांना 'संगीत नाटक अकादमी'चा पुरस्कार लाभला. कल्पना नावाचा नृत्यप्रधान चित्रपट त्यांनी निर्माण केला. भारतीय नृत्यपरंपरेत त्यांनी आधुनिक बॅले नृत्याचा समावेश केला. भारतीय नृत्याला आधुनिक तंत्रांनी समृद्ध करणारा कलावंत म्हणून उदय शंकर यांची कामगिरी नृत्याच्या इतिहासात महत्त्वपूर्ण आहे.

**-पद्मिनीराजे पटवर्धन**

**क्लिक...क्लिक...!**







**श्रीवर्धन : म्हसळा-गोरेगाव मार्गावर गावांची नावे असणारे दिशादर्शक फलक लावल्याने पर्यटकांना आता प्रवास करणे सोयीस्कर झाले आहे.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात उदासपणा का जाणवतो?

सध्या हिवाळा सुरू झाला आहे. सगळीकडे थंड वातावरण आणि गारवा जाणवतोय असं म्हणतात. हवामान बदलामुळे माणसाच्या शरीरावर खूप खोलवर परिणाम होतो आणि हे खरंय, पण तुम्हाला माहिती आहे का? ऋतू बदलांमुळे माणसाच्या मूडवरसुद्धा त्याचा परिणाम होतो. त्यामुळे हिवाळ्यात आपल्याला अनेकदा उदास वाटते.



डेहराडून येथील थ्रिविंग माइंडच्या संस्थापक मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अंकिता प्रियदर्शनी यांच्या हवाल्याने माहिती दिली. त्या सांगतात, सिझनल इफेक्टिव्ह डिसऑर्डरमुळे उदासपणा जाणवतो. अशा वेळी व्यक्तीमध्ये अनुवांशिक आणि पर्यावरणीय घटक खूप महत्त्वाची भूमिका बजावताना दिसून येतात. नैराश्य येण्यापूर्वीची स्थिती असो किंवा हार्मोन्स असंतुलित होणे, याशिवाय वातावरणातील बदलांमुळे आपल्याला उदासपणा जाणवू शकतो.

मेंदूतील सेरोटोनिन हार्मोन व्यक्तीला आनंदी ठेवण्यास मदत करतात, पण हिवाळ्यात सूर्यप्रकाश कमी होतो, त्यामुळे आपल्या दैनंदिन शारीरिक प्रक्रियांवर आणि या सेरोटोनिन पातळीवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे आपल्याला उदास वाटते आणि नैराश्य जाणवते.

त्या पुढे सांगतात, सूर्यप्रकाशाच्या कमतरतेमुळे मेलाटोनिन हार्मोन आणि व्हिटॅमिन डी ची पातळी घसरते, ज्याचा थेट परिणाम आपल्या मूडवर होतो. सूर्यप्रकाश एक महत्त्वाचा घटक असून, ज्यामुळे संवेदनशीलतेवर त्याचा परिणाम जाणवतो.

भरपूर सूर्यप्रकाश घ्या किंवा कृत्रिम प्रकाशात राहा, यामुळे तुमच्या दररोजच्या शारीरिक प्रक्रिया सुरळीत राहतील. याशिवाय हिवाळ्यात थंड ठिकाणी जाणे टाळा. वातावरण गरम राहील अशा ठिकाणी राहा. दिवसभर घराबाहेर वेळ घालवण्याचा प्रयत्न करा. दिवसा थोड्याफार सूर्यप्रकाशात चाला. कामाच्या ठिकाणी किंवा घरात खिडकीजवळ बसा, ज्यामुळे तुम्हाला नैसर्गिक प्रकाश मिळू शकतो.

जर तुम्हाला पुरेसा सूर्यप्रकाश मिळत नसेल तर व्हिटॅमिन डी समाविष्ट असलेला आहार घ्या. यासाठी तुम्ही जवळच्या तज्ज्ञांशी संपर्क करू शकता आणि त्यांचा सल्ला घेऊ शकता. शारीरिक क्रिया सुरळीत ठेवण्यासाठी नियमित झोपा आणि तुमची दिनचर्या बनवा. रात्री सात ते आठ तास चांगली झोप घ्या. हिवाळ्यात आळशीपणा दूर करा. घरी व्यायाम, योगा आणि डान्स करा. यामुळे शारीरिक हालचाली होतील. व्यायामामुळे तुमचा मूड सुधारू शकतो. मित्र-मैत्रिणी आणि कुटुंबाबरोबर वेळ घालवा, पण काही प्रकरणांमध्ये औषधांची गरज भासू शकते.

# मुरूड बस डेपोची दुरवस्था

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा हे ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले पर्यटनस्थळ आहे. मुरूडला १९६० साली एसटी सेवा सुरू झाली. मुरूडला इतिहास आणि निसर्ग असल्याने जगातून पर्यटक मुरूडला सर्वाधिक पसंती देतात. त्यामुळे मुरूडला आगारामध्ये नव्या गाड्या मिळाव्यात, अशी मागणी होत आहे.

मुरूड साळाव रस्ते अतिशय खराब असल्याने जुन्या गाड्यातून नागरिकांना प्रवास करणे म्हणजे एक प्रकारची मरण यातना सहन कराव्या लागतात. एशियाड गाड्यांमध्ये सीट खराब खिडक्या उघडत नाही सुविधा नाही तसेच ठराविक थांबे न घेता गाडी सर्व ठिकाणी थांबवली जाते त्यामुळे गाडीत गर्दी होते. तरीही भाडे दीडपट का द्यावे लागते त्यामुळे सर्व सामान्य जनतेस हे तिकीट परवडणारे नाही, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते हितेंद्र पंड्या यांनी आपली खंत मांडली आहे.

मुरूड आगाराला ११ नवीन बस आल्या, परंतु मुरूडचे नशीब खराब त्या बस न वापरता पुण्याकडे रवाना करण्यात आल्या, मात्र साळाव पूल नादुरुस्त असल्याने त्यावरून १२ टन पेक्षा जास्त वजनाच्या बस जाण्यास बंदी आहे, असे कारण सांगण्यात येते. या नवीन बस इतर ठिकाणी दिल्यामुळे जुन्या गाड्यांवरच मुरूड आगराचा कारभार सुरू आहे.

डेपोतील चालक व वाहक यांची चार वर्षे भरती नसल्याने आज ९० चालक वाहक कमी आहे. असलेल्या चालकांवर कामाचा अति भर येत आहे. त्यामुळे गाड्या वेळेवर सुटत नसल्याने प्रवाशाची कुचंबना होत आहे. याकडे आमदार व खासदार यांनी लक्ष देणे खूप आवश्यक आहे.

या वेळी हितेंद्र पांड्या यांनी सांगितले की, मुरूड डेपोचे कॉंक्रीटीकरण गेली तीन वर्ष अर्धवट आहे. मोठ मोठे खड्डे पडले आहेत, परंतु विभाग नियंत्रक पेण लक्ष देत नाहीत. मुरूड रहिवाशांना मुरूड डेपोतून कोणतेही पार्सल पाठवता येत नाही अशी सुविधा डेपोत नाही, अशी खंतसुद्धा या वेळी त्यांनी व्यक्त केली आहे.



# ओबीसी प्रवर्गाकरिता मोदी आवास घरकुल योजनेसंदर्भात आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

इतर मागास प्रवर्गातील ग्रामीण भागातील लाभार्थ्यांसाठी मोदी आवास योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना कच्चे घर असल्यास ग्रामीण भागासाठी रु.१ लाख २० हजार वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटूंबास मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत २६९ चौरस फूट घरकुल मंजूर करण्यात येते. या घरकुलासाठी ग्रामीण क्षेत्राकरिता एक लाख २० हजार रुपये अनुदान देय आहे.

या योजनेकरिता जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, जागेची आवश्यक कागदपत्रे आणि इतर कागदपत्रे आवश्यक आहेत. योजनेचा लाभ ज्या इच्छुक लाभार्थ्यांना घ्यावयाचा आहे, त्यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती येथे संपर्क साधावा. तसेच योजनेच्या अधिक माहितीकरिता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड-अलिबाग, कच्छीभवन, नमीनाथ मंदिराजवळ, सेंटमेरी स्कूल समोरील, श्रीबाग रोड, अलिबाग यांचे कार्यालय येथे संपर्क साधावा, असे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुनील जाधव यांनी कळविले आहे.

# अलिबागच्या सुयशला न्युयॉर्क येथे डॉक्टरेट पदवी

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुरूळ गावातील सर्वसामान्य कुटूंबातील सुयश पाटीलने सेंन्ट जॉन्ह युनिव्हरसिटी न्युयॉर्क येथे टिबी या रोगावर यशस्वीपणे संशोधन पूर्ण केले. टिबी या रोगावर बनविलेले औषध सुयशने युनिव्हरसिटी कमिटीसमोर सादर केले. या औषधाला कमिटीने मान्यता देत नुकतीच सुयशला डॉक्टरेट पदवी न्युयॉर्क येथे बहाल करण्यात आली. सुयशने मिळविलेल्या यशाचे सर्व स्तरातून आभिनंदन होत आहे.



क्षयरोग (टीबी) हा अत्यंत संसर्गजन्य रोग आहे. हा रोग जडण्याची बहुतांश कारणे आहेत. या रोगाचे उच्चाटन करण्यासाठी प्रभावी उपचार विकसित करण्याची आणि रुग्णांना प्रदान करण्याची तातडीने गरज आहे. सेंट जॉन्स युनिव्हर्सिटी, न्यू यॉर्क येथे सुयशच्या शोधनिबंधाच्या कामात, त्याने संसर्गापासून जास्तीत जास्त परिणामकारकतेसाठी आणि कमी खर्चात इनहेलेशन मार्गाने वितरित करण्यासाठी टीबीविरोधी औषधांची पावडर तयार केली.

प्रबंध समितीने उपचार पद्धतीचा आढावा घेतला आणि सुयशने बनविलेल्या पावडरला मान्यता देत त्याला डॉक्टरेट प्रदान केली. या प्रकल्पाला डॉ. नितेश कुंदा यांनी मार्गदर्शन केले. सुयशच्या प्रोजेक्ट करीता औषधनिर्माण विभागाकडून निधी मिळाला.



## जाहीर नोटीस

आम्ही खाली सही करणार सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळवितो की :-

१) मौजे वावर्ले, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील प्रमाणे हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हेक्टर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|
| **१६१** | १-८७-० | २-२५ |

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या जमीनीबाबत आम्ही दिनांक २८/०७/२०१४ रोजीचे कुल अखत्यार पत्राने त्या कुल अखत्यार पत्रात नमुद केलेली कामे करणेसाठी आमचे अखत्यारी म्हणून अरुण दत्तात्रेय पाटील यांना नेमले होते. सदरचे कुल अखत्यार पत्र मोतीलाल जे. ओसवाल, नोटरी, रा. मु.पो.ता. कर्जत, जि. रायगड यांचे कार्यालयात अनुक्रमांक १४६५/२०१४ वर नोटराईज केले होते.

३) आता आम्हास वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या जमिनीबाबत करावी लागणारी सर्व कामे करण्यासाठी आमचे अखत्यारी म्हणुन अरुण दत्तात्रेय पाटील यांची आवश्यकता अगर गरज राहीलेली नाही व म्हणुन आम्ही अरुण दत्तात्रेय पाटील यांचे नावे लिहुन दिलेले दि. २८/७/२०१४ रोजीचे कुल अखत्यार पत्र कायमचे रद्द केले आहे व तसे त्यांना दिनांक २९/११/२०२३ रोजीच्या नोटीसीने कळविले आहे.

४) सबब आता अरुण दत्तात्रेय पाटील यांना आमचे अखत्यारी म्हणुन कोणतीही कामे करणेचा अधिकार राहीलेला नाही. सबब अरुण दत्तात्रेय पाटील यांचेशी आमचे अखत्यारी म्हणुन कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार, करार, दस्तऐवज, हस्तांतरण, पत्रव्यवहार करु नये. याउप्पर अरुण दत्तात्रेय पाटील यांनी आमचे अखत्यारी कोणाशीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार, करार, दस्तऐवज, हस्तांतरण, पत्रव्यवहार केल्यास तो आमचेवर बंधनकारक राहणार नाही व त्या परिस्थितीत आम्हास स्वतःचे हिताचे रक्षणाकरीता संबंधीतांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करणे भाग पडेल व त्या वेळेस त्याकामी माझे होणारे सर्व खर्चाची नुकसानीची व परिणामांची संपुर्ण जबाबदारी अरुण दत्त्यात्रेय पाटील यांचेवर व संबंधीत बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्या व्यक्तींवरच राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**१) द्वारकाबाई उर्फ तारामती हरिश्चंद्र भोसले**
रा. सालवड, ता. कर्जत, जि. रायगड

**२) निराबाई गणपत मोरे**
रा. नांगुर्ले वरणे, ता. उरण जि. रायगड

**३) शेवंती मधुकर पारठे,**

**४) प्रकाश मधुकर पारठे**

**५) रुपेश मधुकर पारठे,**
क्रमांक ३ ते ५ रा. भोराडपाडा रस्ता, चिंचेश्वरी पाडा, बदलापुर, जि. ठाणे

**६) रंजना उर्फ उर्मिला उल्हास कदम**
रा. मु. पो. खोपोली, खालापुर, जि. रायगड


**७) मोहीनी मधुकर पारठे उर्फ मोहीनी ललित खरीवले**
रा. मु. पो. वावंढळ, ता. खालापुर, जि. रायगड


# धापाया मंदिरात मुख्याधिकाऱ्यांकडून पाहणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे ग्रामदैवत श्री धापाया मंदिराच्या गाभाऱ्यात बाराही महिने पाणी साचते. यासंदर्भात कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांना भेट घेवून ग्रामस्थांनी निवेदन दिले होते, त्याची दखल घेऊन गारवे यांनी मंदिरात पाहणी केली.

मुख्याधिकारी वैभव गारवे, नगर परिषदेचे अभियंता मनिष गायकवाड हे श्री धापाया मंदिरात येऊन त्यांनी प्रत्यक्ष पहाणी केली. या वेळी विजय हरिश्चंद्रे, देवस्थान मंडळाचे माजी नगरसेवक मुकेश पाटील, महेंद्र चंदन, भाई आणेकर, मोहन भोईर, अजय वर्धावे आदी उपस्थित होते.



मुख्याधिकारी गारवे यांनी, याबाबत योग्य ती उपाय योजना करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावर उपस्थितांनी सांगितले की, आपण जी काय उपाययोजना कराल ती श्री धापाया महाराजांचा अक्षय्य तृतीयेला उत्सव असतो, त्या पुर्वी कायम स्वरूपाची उपाय योजना करावी, कृपया तात्पुरती मलमपट्टी करू नये.



## RE - E- TENDER NOTICE

MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | RFx No :-7000029123 **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/Re-e-Tender-59/2023-2024.** RFx Re-e-tender for AMC for various regular preventative maintenance/emergency and breakdown works of various 220kV & 100kV Substations under EHV O&M Dn. Panvel. **Tender amount Limited to Rs. 20,00,000/-, EMD amount Rs. 20,000/-** |
| 2. | Online Downloading the RFx | **08.12.2023, 18:00 Hrs. to 17.12.2023, 23:59 Hrs.** |
| 3. | Online Submission of the RFx | **On or Before 17.12.2023 up to 23:59 Hrs.** |
| 4. | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **18.12.2023 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410. **Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(A.P.Joshi)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**




CIDCO — WE MAKE CITIES

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.

## शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

### PUBLIC NOTICE

**Preliminary NAINA Town Planning Scheme, No. 5**
(At part of villages Bonshet, Bhokarpada(Chipale),
Devad, Moho, Shivkar, Vichumbe, Vihighar)
(under Section 72(7) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)
(read with Rule 13(9) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974)
NO. ARB/TPS-5/Award/2023/825

WHEREAS, the Draft NAINA Town Planning Scheme, No. 5 at part of Villages Bonshet, Bhokarpada (Chipale), Devad, Moho, Shivkar, Vichumbe and Vihighar has been sanctioned by the Vice Chairman & Managing Director, CIDCO under sub-section (2) of section 68 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter, referred to as the 'said Act') vide Notification No. CIDCO/ NAINA/ TPS-5/ Draft Scheme/ 2022/ 564; dated 21st October 2023, in exercise of the powers delegated to him by the Urban Development Department vide its Notification No.TPS-1817/973/C-103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification is published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II, dated 4th November 2022 on pages No. 1 to 6;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department has appointed Shri Shrirang D. Landge, retired Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme vide Notification No. TPS-1222/2152/C.R.148/22/UD-12 Dated 02nd December 2022 under sub-section (1) of Section 72 of the said Act;

And whereas, the Arbitrator, in accordance with Rule No. 13 (1) of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 (hereinafter referred to as the 'said Rules'), has declared under his notice dated 5th April 2023 published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II, dated 25th April 2023 that he has commenced the duties as Arbitrator in respect of the NAINA Town Planning Scheme, No. 5 at part of Villages Bonshet, Bhokarpada (Chipale), Devad, Moho, Shivkar, Vichumbe and Vihighar with effect from 5th April 2023;

And whereas, the special notices in the prescribed form No. 4 have been served to each and every owner of the lands included in the said scheme & their hearings with recording minutes thereof in this respect have been completed;

And whereas, the NAINA Town Planning Scheme, No. 5 at part of Villages Bonshet, Bhokarpada (Chipale), Devad, Moho, Shivkar, Vichumbe and Vihighar has been sub-divided by the Arbitrator into Preliminary Scheme & Final Scheme on 20th October 2023 as provided under sub-section (3) of section 72 of the said Act;

And whereas, the Arbitrator has followed the procedure, prescribed in Rule No. 13 of the said Rules, and has carried out the duties laid down in sub-section (4) of section 72 of the said Act.

Now, therefore, the undersigned as Arbitrator hereby declares that the Preliminary NAINA Town Planning Scheme, No. 5 at part of Villages Bonshet, Bhokarpada (Chipale), Devad, Moho, Shivkar, Vichumbe and Vihighar has been drawn up by him on 30th November, 2023 as provided under sub-section (7) of Section 72 of the said Act read with rule 13 (9) of the said Rules.

The Preliminary Scheme so drawn up by the undersigned has been published and copies thereof have been kept open for the inspection of the land owners and of the public during office hours at the office of the Arbitrator and of the Special Planning authority, NAINA, at 7th floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD, Belapur, Navi Mumbai-400614.

Date : 30th November, 2023

Place: NAINA, 7th Floor, Tower No. 10, CBD-Belapur, 400614.

**S. D. LANDGE**
**Arbitrator,**
NAINA Town Planning Scheme No. 5.
at part of Villages Bonshet, Bhokarpada (Chipale),
Devad, Moho, Shivkar, Vichumbe and Vihighar

### जाहीर सूचना

**प्राथमिक नैना नगर रचना परियोजना क्र. ५,**
**(बोनशेत, भोकरपाडा (चिपळे), देवद, मोहो, शिवकर, विचुंबे आणि विहिघर)**
**(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९) सहित**
**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(७) अन्वये)**
**क्र. लवाद/नरयो-५/ नैना / निवाडा/२०२३/ ८२५**

ज्याअर्थी, प्रारुप नैना नगर रचना परियोजना क्र.५, (मौजे बोनशेत, भोकरपाडा (चिपळे), देवद, मोहो, शिवकर, विचुंबे आणि विहिघर) ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र.१०३/१७/नवि-१३, दिनांक १३/०९/२०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ६८ च्या पोटकलम (२) अन्वये त्यांची अधिसूचना क्र.सिडको/नैना/न.र.यो.५ /प्रा.यो. /२०२२/ ५६४ दिनांक २१/१०/२०२२ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्रात** असाधारण भाग-२ मधील पृष्ठ क्र. १ ते ६ वर दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने श्री. श्रीरंग दि. लांडगे, निवृत्त संचालक, नगर रचना यांची नेमणूक उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (१) प्रमाणे उक्त मंजूर प्रारुप परियोजनेसाठी लवाद म्हणून अधिसूचना क्र.टीपीएस-१२२२/२१५२/प्र.क्र.१४८/२२/नवि-१२,दिनांक ०२/१२/२०२२ अन्वये केली आहे.

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३ अन्वये **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग-२ मध्ये दिनांक २५/०४/२०२३ रोजी सूचना प्रसिद्ध करुन नैना नगर रचना परियोजना क्र. ५, (मौजे बोनशेत, भोकरपाडा (चिपळे), देवद, मोहो, शिवकर, विचुंबे आणि विहिघर) करीता लवाद म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचे काम दिनांक ५ एप्रिल २०२३ पासून सुरु करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी विहीत केलेल्या नमुना क्रमांक ४ मधील विशेष सूचना उक्त नगर रचना परीयोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व जमीन मालकांना देण्यात आलेल्या असून त्यांची या संदर्भातील सुनावणी पूर्ण करून त्याबाबतची टिपणे नोंदविण्यात आलेली आहेत.

आणि ज्या अर्थी नैना नगर रचना परियोजना क्र. ५, (मौजे बोनशेत, भोकरपाडा (चिपळे), देवद, मोहो, शिवकर, विचुंबे आणि विहिघर) हीची उक्त अधिनियमांच्या पोटकलम (३) कलम ७२ अन्वये दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी प्राथमिक योजना व अंतिम योजना अशी उपविभागणी करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त नियमांमधील नियम क्र.१३ प्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करुन उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (४) मधील कर्तव्ये पार पाडण्यात आलेली आहेत.

त्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार नैना नगर रचना परियोजना क्र. ५, (मौजे बोनशेत, भोकरपाडा (चिपळे), देवद, मोहो, शिवकर, विचुंबे आणि विहिघर) या योजनेचे लवाद म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (७) प्रमाणे तसेच उक्त नियामांचा नियम क्र.१३ (९) प्रमाणे ही परियोजना दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी तयार करण्यात आली आहे असे जाहीर करीत आहेत.

ही प्राथमिक परियोजना निम्नस्वाक्षरीकार लवाद यांच्या कडून तयार करण्यात आल्यानंतर जनतेच्या तसेच या परीयोजनेत समाविष्ट झालेल्या जमीनींच्या मालकांच्या अवलोकनार्थ लवादांच्या व नैनाच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई ४०० ६१४ येथे प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दिनांक : ३०/११/२०२३
पत्ता: नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सी.बी.डी. बेलापूर- नवी मुंबई ४०० ६१४

**(श्रीरंग दि. लांडगे)**
**लवाद,**
**नैना नगर रचना परियोजना क्र. ५,**
बोनशेत, भोकरपाडा (चिपळे), देवद, मोहो, शिवकर, विचुंबे आणि विहिघर

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**CIDCO/PR/447/2023-24**

निवडक



## डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**नवी मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक आवटे, मुख्याध्यापिका गवस तसेच प्रमुख वक्ते माधुरी बागडे, निशिकांत महांकाळ यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. या वेळी विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर भाष्य करणारी, त्यांची महती सांगणारी सुश्राव्य गीते, भाषणे याचे सादरीकरण केले. प्रमुख वक्त्य माधुरी बागडे यांनीही आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांसमोर बाबासाहेबांच्या जीवनातील अतिशय हृदयस्पर्शी प्रसंग, त्यांचे प्रेरक विचार अतिशय सोप्या शब्दात मांडून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

## राज्यस्तरीय सत्संग महोत्सव

**नवी मुंबई :** अध्यात्मिक गुरु श्री श्री ठाकूर अनुकुलचंद्रजी यांचा १३६ व जन्ममहोत्सव आणि महाराष्ट राज्यातील सत्संग महोत्सव येत्या १० डिसेंबर रोजी वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्रात आयोजित करण्यात आलेला आहे. सकाळी ७ वाजता या सत्संग महोत्सवाला सुरुवात होणार असून दिवसभर विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमाची रेलचेल या कार्यक्रमात असणार आहे. त्यामुळे अधिकाधिक भाविकांनी या राज्यस्तरीय सत्संग महोत्सवाला भेट द्यावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नवी मुंबईतील समस्यांबाबत आमदार गणेश नाईक आक्रमक

### महापालिका आयुक्तांसमवेत बैठक



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या हक्काचे पाणी मिळाले पाहिजे नवी मुंबई महापालिकेला एमआयडीसीच्या बारवी धरणातून मिळणारा हक्काचा पाणीसाठा मिळत नाही. त्याचबरोबर नवी मुंबईमध्ये पाणीटंचाई असताना सिडको क्षेत्रातील खारघर आणि कामोठे या भागात पालिकेच्या मोरबे धरणातून ८० एमएलडी पाणीपुरवठा करण्यात येतो. नवी मुंबई शहराला हक्काचा पाणीपुरवठा झाला पाहिजे, असे आमदार नाईक यांनी या बैठकीत स्पष्ट केले. येत्या दोन महिन्यांत खारघर आणि कामोठे या क्षेत्रामध्ये सिडको पाणीपुरवठा करणार आहे. त्यामुळे पालिकेचे वाचणारे ८० एमएलडी पाणी नवी मुंबईला परत मिळून पाणीपुरवठ्यात सुधारणा होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

काही भ्रष्ट अधिकारी काही घटकांच्या दडपणाखाली आणि दहशतीखाली येऊ ठराविक प्रभागांमध्ये कृत्रिम पाणीटंचाई निर्माण करीत आहेत जेणेकरून येथील लोकप्रतिनिधींना जनतेच्या रोशाला सामोरे जावे लागेल. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना गर्भित इशारा देत असे करण्यापासून लांब राहण्याचा सल्ला दिला.

नवी मुंबईची वाढती लोकसंख्या पाहता भविष्यात सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी वैतरणा आणि भिरा पाणी योजना लोकनेते आमदार नाईक यांनी सुचवल्या आहेत. शासनाकडे पाठपुरावा करून या दोन्ही योजनांना गती देण्याची मागणी आमदार नाईक यांनी केली. त्या दृष्टीने कार्यवाही सुरू असल्याची माहिती आयुक्त नार्वेकर यांनी दिली.

बारवी धरणग्रस्तांना कायमस्वरूपी नोकऱ्या देण्यामध्ये ज्याप्रकारे महापालिका प्रशासनाने तत्परता दाखवली त्याचप्रकारे मोरबे धरण प्रकल्पग्रस्त सिडको आणि एमआयडीसी प्रकल्पग्रस्तांनादेखील तातडीने महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी कार्यवाही गतिमान करण्याची मागणी लोकनेते गणेश नाईक यांनी बैठकीत केली. त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वासन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिले.

महापालिकेचे हित जोपासण्यामध्ये अपयशी ठरलेल्या महापालिकेच्या विधी विभागाची पुनर्रचना करण्याची मागणीदेखील आमदार नाईक यांनी केली. अकार्यक्षम अधिकाऱ्यांना बदलून त्यांच्या जागी कार्यक्षम अधिकारी नेमण्याची सूचना केली. महापालिकेला मिळणारे सुविधा भूखंड या कामचुकार अधिकाऱ्यांमुळे हातचे गेल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला. सध्याचे विधी विभागातील अधिकारी हे केवळ बिल्डर आणि ठेकेदारांच्या फायद्यासाठी काम करीत आहेत. वारंवार सांगूनही पालिकेचे सुविधा भूखंड वाचवण्यासाठी कॅव्हेट दाखल करीत नाहीत.

महापालिकेच्या रुग्णालयांमधून सर्वसामान्य नवी मुंबईकर उपचार घेत असतो, परंतु रुग्णालयांमधून तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसतात. त्याचबरोबर विविध वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी गरजेच्या वेळेस यंत्रणा नसते. याबाबत आमदार नाईक यांनी महापालिका प्रशासनाला धारेवर धरले. सर्वसामान्यांना उपचाराची चांगली सुविधा मिळण्यासाठी २४ तास यंत्रणा उपलब्ध करण्याची मागणी केली.

**वंडर्स पार्कचे दर वाढवू नका**

वंडर्स पार्कचे प्रवेशाचे दर वाढवण्यात आलेले आहेत. हे दर अजिबात वाढू देणार नाही. वंडर्स पार्क मधील आवश्यक दुरुस्ती करून आहे त्याच दरामध्ये सर्वसामान्यांसाठी हे थीम पार्क सुरू ठेवावे, अशी मागणी आमदार नाईक यांनी केली.

**...तर ऐरोली-काटई उड्डाणपुलाचे काम बंद पाडू**

ऐरोली काटई उड्डाणपुलावर कल्याणच्या दिशेने आणि मुंबईच्या दिशेने चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी मार्गिका बांधण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. निर्देशानंतरही याबाबत कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. येत्या तीन महिन्यांमध्ये या मार्गिकांचे काम गतिमान केले नाही तर जनहितासाठी या उड्डाणपुलाचे काम बंद पाडू, असा इशारा आमदार गणेश नाईक यांनी या वेळी दिला.

## महावितरणच्या थकबाकीदारांना कायदेशीर कारवाई टाळण्याची संधी

**नवी मुंबई : बातमीदार**

महावितरण वाशी मंडळातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित करण्यात आलेले वीज ग्राहक तसेच वीज बिलाबाबत वाद व वीज चोरीच्या न्यायालयात दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांच्या थकबाकी व त्यावरील व्याज याचे तडजोडीने निपटारा करण्याची तसेच पुढील कायदेशीर कारवाई टाळण्याची संधी आहे. त्यासाठी या ग्राहकांना तालुका न्यायालय स्तरावर शनिवारी (दि. ९) आयोजित लोक अदालतीत सहभागी व्हावे लागेल. या संधीचा फायदा घेण्याबाबत वीज ग्राहकांना आवाहन करण्यात येत आहे.

वाशी मंडळ कार्यक्षेत्रातील बेलापूर, पनवेल, व उरण येथील न्यायालयात दि.०९.१२.२०२३ ला राष्ट्रीय लोक अदालत आयोजित होणार आहे. बेलापूर येथील न्यायालयात वीजपुरवठा खंडित करण्यात आलेल्या ५५०८ ग्राहकांचे तसेच वीज चोरीच्या २३५ ग्राहकांचे दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे तर पनवेल येथील न्यायालयात वीजपुरवठा खंडित करण्यात आलेल्या ३५४६ ग्राहकांचे तसेच वीज चोरीच्या २४० ग्राहकांचे दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे तर उरण येथील न्यायालयात वीजपुरवठा खंडित करण्यात आलेल्या १४५४ ग्राहकांचे दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आलेली आहे. वाशी मंडळातील संबंधित ग्राहकांना सकाळी ११ ते दुपारी २ दरम्यान लोक अदालतीत सहभागी होण्याबाबत न्यायालया मार्फत नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत अशी माहिती वाशी मंडळाचे सहा.विधी अधिकारी राजीव वामन यांनी दिली आहे.

नोटीस मिळाली नसेल तरीही या ग्राहकांना लोक अदालतीत सहभागी होऊन आपल्या प्रकरणांचा निपटारा करून घेता येईल. संबंधित ग्राहकांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील तालुका न्यायालयात आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा व पुढील कायदेशीर कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणच्या भांडूप परिमंडळाचे मा. मुख्य अभियंता, सुनील काकडे व वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता, सिंहाजिराव गायकवाड यांनी केले आहे.

## मानवी हक्क दिन १० डिसेंबरला साजरा करावा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

समाजाच्या विविध घटकांमध्ये मानवी हक्कविषयक शिक्षण वाढीस लागण्यासाठी व सर्वसामान्य लोंकामध्ये मानवी हक्क संस्कृती निर्माण होण्यासाठी १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून राज्यात कायमस्वरुपी साजरा करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

या वर्षी मानवाधिकारांच्या सार्वत्रिक घोषणेची Theme DIGNITY, FREEDOM JUSTICE FOR ALL अशी आहे. मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ मधील कलम १२ अन्वये मानवी हक्कांबाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्वपूर्ण अविभाज्य भाग आहे. या कायद्यांतर्गत समाजातील तळागाळापर्यंत जनतेला मानवी हक्काचे न्याय माहित होणे व त्याबद्दल जनजागृती होण्यासाठी कार्यक्रमाचे प्रभावी आयोजन करणे आवश्यक आहे. सर्व शासकीय कार्यालयाने १० डिसेंबर २०२३ रोजी मानवी हक्क दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात यावा व आयोजित केलेल्या कार्यक्रमास मिळालेला प्रतिसाद, सविस्तर माहिती, वृत्तपत्र कात्रण व फोटोसहित आपल्या अभिप्रायासह अहवाल मा. सचिव, राज्य मानवी हक्क आयोग यांचे कार्यालयास तसेच या कार्यालयास सादर करण्यात यावा, अशी माहिती विभागीय आयुक्त सामान्य प्रशासन विभागाने प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.



**पनवेल : गार्डन नाका येथील रिक्षा स्टॅन्डच्या रिक्षा चालक व मालकांनी भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी इरफान पावले, पांडुरंग मोकल, प्रदीप कदम, नितीन पवार, सोमनाथ पवार, समीर पाटील, अमित शेरीकर आदी उपस्थित होते.**

## नवी मुंबईत अत्याधुनिक बस टॉयलेटचे लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीयांच्या नेतृत्वाखाली केंद्रातील सरकारला ९ वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्त देशभरात विकास कामांचा अहवाल जनतेच्या घरा घरात पोहचविण्याचे काम चालू आहे. तसेच मनपाच्या स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत आमदार मंदा म्हात्रे यांच्या टाकाऊ पासून टिकाऊ या संकल्पनेतून मोडकळीस आलेल्या बसेसचे रूपांतर करून महिला व पुरुषांकरिता दोन बसेस उपलब्ध करून डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्याभूमीवर जाणाऱ्या नागरिकांच्या सोईसुविधा करता तसेच महामार्गावर ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सेवेसाठी आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते बसचे उदघाटन झाले.



या वेळी आयुक्त यांनी सांगितले की, आज आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या आमदार निधीमधून ज्या महापालिकेच्या परिवहन विभागातील मोडकळीस आलेल्या बसेसचे रुपांतर टॉयलेटमध्ये करून महिला व पुरुषांकरिता शौचालय उपलब्ध करून दिले त्यामुळे नाविन्यपूर्ण संकल्प बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या माध्यमातून पहावयास मिळाले. त्यामुळे सायन-पनवेल हायवेमार्गावरील प्रवासांना एक सुविधा उपलब्ध झाली. अजून अश्या जुन्या बसेसची गरज लागेल त्यावेळेस महापालिकेच्या वतीने मोडकळीस आलेल्या बसेस उपलब्ध करून दिल्या जातील.

या वेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले की, सायन-पनवेल हायवे लगत जिथे नागरिकांची मोठ्या संख्येने प्रवासांची ये-जा असते त्या ठिकाणी २० बसेसची व्यवस्था व प्रत्येक ठिकाणी सुरक्षारक्षकाची नेमणूक केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्यासमवेत माजी नगरसेवक सुनील पाटील, कुणाल महाडिक, राजेश राय, राजेश पाटील, पांडुरंग आमले, विनायक गिरी, दर्शन भारद्वाज, सुभाष गायकवाड, निलेश पाटील, विनोद शहा, प्रमोद जोशी, जयश्री चित्रे, मनोज मेहेर, संदीप मेहेर असंख्ये भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## आंबेडकर स्मारकात बाबासाहेबांना वैचारिक अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबईत चैत्यभूमीवर जनसागर ओसंडून वाहत असतो. याठिकाणी महाराष्ट्राच्या विविध भागांतूनच नव्हे तर देशाच्या विविध राज्यांतून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित रहात असतात.



चैत्यभूमीवर आवर्जून येणाऱ्या या देशभरातील नागरिकांनी बाबासाहेबांचे ज्ञानस्मारक म्हणून नावाजले जात असलेल्या ऐरोली येथील नवी मुंबई महापालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला भेट देऊन बाबासाहेबांना वैचारिक अभिवादन करावे यादृष्टीने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार चैत्यभूमीवर ज्ञानस्मारकाची माहिती प्रसारित करणारा स्टॉल प्रदर्शित करण्यात आलेला आहे. काल मध्यरात्रीपासून आज सायं. ५ वाजेपर्यंत चैत्यभूमीवर आलेल्या २६ हजारांहून अधिक नागरिकांनी या स्टॉलला भेट दिली असून नवी मुंबई महापालिकेच्या या ज्ञानस्मारकाची माहिती घेतली आहे.

त्यामधील अनेक नागरिकांनी मोठ्या संख्येने नवी मुंबईत ऐरोली येथील स्मारकस्थळी येऊन बाबासाहेबांना वैचारिक अभिवादन केले. स्मारकामध्ये पहाटे ५ वाजल्यापासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत ७ हजाराहून अधिक नागरिकांनी भेट देत बाबासाहेबांचे वैचारिक स्मारक म्हणून नावाजल्या जाणाऱ्या या आगळ्या वेगळ्या ज्ञानस्मारकाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. स्मारकाला भेट देणाऱ्या नागरिकांसाठी महापालिकेच्या वतीने अल्पोपहार आणि चहापान व्यवस्था करण्यात आली होती.

स्मारकामध्ये असलेले बाबासाहेबांचे जीवनचरित्र पूरक दूर्मीळ छायाचित्रांसह मांडणारे विशेष दालन, ऑडिओ व्हिज्युअल सुविधांनी परिपूर्ण ई-लायब्ररीसह पाच हजारांहून अधिक पुस्तकांनी समृध्द ग्रंथालय, आभासी चलचित्र प्रणालीव्दारे बाबासाहेबांचे प्रत्यक्ष भाषण ऐकण्याची होलोग्राफिक प्रेझेन्टेशन सुविधा, एकाच वेळी २०० व्यक्ती ध्यान करू शकतील असे भव्य ध्यानकेंद्र तसेच २५० आसन क्षमतेचे वातानुकुलीत प्रशस्त सभागृह अशा गुणवत्तापूर्ण सुविधा पाहून वेगवेगळ्या स्तरांतील नागरिकांनी असे स्मारक पाहिलेच नव्हते, धन्यता वाटली असे अभिप्राय देत पुस्तकांना सर्वस्व मानणाऱ्या बाबासाहेबांचे खरेखुरे दर्शन घडल्याची भावना व्यक्त केली. अनेकांनी येथील ध्यानकेंद्रात कालपासूनच सुरू झालेल्या आनापान ध्यान शिबिराचा लाभ घेतला.

स्मारकामध्ये प्रवेश केल्यानंतर तर एक वेगळीच अलौकिक अनुभूती जाणवते असेही अभिप्राय अनेकजण नोंदवित आहेत.

## गव्हाण विद्यालयात अभिवादन सभा

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विश्वरत्न, विश्वमानव, महामानव, भारतरत्न, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर अर्थात बाबासाहेब आंबेडकर यांचा ६७ वा महापरिनिर्वाण दिन श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज आ भगत कनिष्ठ महाविद्यालय गव्हाण कोपर येथे अभिवादन सभेने झाला.

यावेळेस कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे उपप्राचार्य श्री मंडले पी बी तसेच रयत शिक्षण संस्थेचे समन्वय समितीचे जनरल बॉडी सदस्य व लाईफ मेंबर श्री भोईर आर एस तसेच रयत शिक्षण संस्थेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. सर्वप्रथम दुपारी या महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आलं आणि संध्याकाळी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसमोर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा महिमा सादर करण्यात आला. या वेळी मृदुला जाधव, प्रज्ञा लोखंडे चांदणी सिंग, स्नेहल शेट्टी यांनी मराठी व हिंदी मधून बाबासाहेबांचा महिमा सांगितला. तर इयत्ता आठवी अ मधील रेवती भोसले या मुलीने सुंदर असं काव्यगान सादर केलं. विद्यालयातील गायक वृंदांनी, माझ्या भिमाचं अक्षर दिसतय सोन्या वानी रं..... हे अतिशय बहारदार गीत सादर केलं या गीताने सर्व शिक्षक व विद्यार्थी व रयत प्रेमींना मंत्रमुग्ध केले.

प्रमुख वक्ता म्हणून विद्यालयातील उत्कृष्ट सूत्रसंचालक व इयत्ता दहावी ब चे वर्गशिक्षक तसेच वक्तृत्व विभाग प्रमुख श्री रंधवे एस एस यांनी भाषण केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय प्रवास त्यांनी अतिशय साध्या सोप्या भाषेत विद्यार्थ्यांपर्यंत मांडला. तसेच त्यांनी स्वतः तयार केलेली गझल देखील येथे सादर करण्यात आली. इयत्ता दहावी अ चा वर्ग शिक्षिका व परीक्षा विभाग प्रमुख सौ पाटील सी.एम यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न केला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. आर. पाटील यांनी केले.

या वेळी गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सुजाता शेलार, प्रमोद करावकर व इतर शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



निवडक

## श्रीगाव येथे आयुष्मान कार्डचे वितरण



**पाली** : अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथे सक्षम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून मोफत आयुष्मान कार्ड बनविण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला. त्याबद्दल सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष लहु म्हात्रे यांनी आभार म्हणून यापुढेही असे उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला. कार्यक्रमास सचिव कमलाकर पाटील, खजीनदार बबन पिंगळे, संस्थेचे सल्लागार ॲड. दामोदर पाटील, मनोज पाटील, प्रणाली राऊत व इतर मान्यवर हजर होते.

## आळंदी येथे वारकरी अधिवेशन

**नागोठणे** : आपल्या विविध मागण्यांसाठी शनिवारी (दि. ९) आळंदी येथे वारकरी अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रीय वारकरी परिषदचे कार्याध्यक्ष हभप बापू महाराज रावकर यांनी दिली. अधिवेशन दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत श्री देविदास धर्मशाळा तथा वै. मामासाहेब दांडेकर स्मृती मंदिर, गोपाळपुरा येथे घेण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. अधिवेशनाबाबत अधिक माहितीसाठी हभप बापू महाराज रावकर (९९७५५७२६८४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# चौक ग्रामीण रुग्णालयात पदे रिक्त

## इमारतीचीही दूरवस्था; रुग्णांची परवड




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक ग्रामीण रुग्णालयात अनेक समस्या असल्याने रुग्णांची परवड होत आहे. रुग्णालयात मंजूर पदांपैकी जवळपास ५० टक्के पदे रिक्त असल्याने अपुऱ्या कर्मचाऱ्यांवर भार पडत आहे.

या रुग्णालयात बहुतांश आदिवासी भागातील नागरिक येतात. अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे परिचारिका यांच्यावरच भार येत असून १२ तास येथील कर्मचाऱ्यांना काम करावे लागत आहे. याच रुग्णालयात शासनाने ठरवून दिलेले कार्यक्रम होतात. त्यामध्ये गरोदर माता तपासणी, दंतचिकित्सा, नेत्र तपासणी तपासणी तसेच विविध प्रकारचे रक्तनमुने तपासणी अशा एक ना अनेक सुविधा देण्याचे काम आहे.

परिचारिका पदे सात मंजूर असताना तीन परिचारिका आहेत. त्यातही एक परिचारिका उच्च शिक्षणासाठी रजेवर गेल्याने दोनच परिचारिका येथे कार्यरत आहेत, तसेच वर्ग ४ची सात मंजूर पदे असून त्यापैकी केवळ तीन पदे भरलेली आहेत.

औषध निर्माण अधिकारी यांचे मागील दोन वर्षांपासून पद रिक्त असल्यामुळे येथील परिचारिका यांनाच तेदेखील काम करावे लागत आहे, तसेच कार्यालयातही दोन लिपिक व एक सहाय्यक अधीक्षक यांचे पद मंजूर असताना त्यातही एकच लिपिक कार्यरत आहे, महत्त्वाची बाब म्हणजे येथे डॉक्टरदेखील कंत्राटी पद्धतीवर काम करीत आहे.

नव्याने सुरू करण्यात आलेल्या दंत चिकित्सा विभाग एका पत्राच्या खोलीमध्ये सुरू आहे. या रुग्णालयात एकूण ३० बेडची व्यवस्था असून प्रत्येक विभागात १० बेड आहेत. या रुग्णालयात गरोदर मातांचे प्रसुतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात होत असून दिवसेंदिवस गरोदर मातांचे प्रमाण वाढत चालले आहे. रुग्णांना जरी व्यवस्थित सुविधा मिळत असली तरी ऑपरेशन थिएटर हे बंद असून ही इमारतदेखील जीर्ण अवस्थेत पडली आहे.

**आम्ही वेळोवेळी वरिष्ठांकडे लेखी मागणी केली असून त्यांनी आमच्या विनंती अर्जाचा विचार करावा व येथील रुग्णालयाला ज्या सुविधा लागतील त्याची पूर्तता त्यांनी वरिष्ठ पातळीवरून करावी. येथे रुग्णांची व्यवस्था चांगल्या प्रकारे होत असून रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आमच्याकडे असलेल्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे आम्हालादेखील काही अडचणींचा सामना करावा लागत आहे.**

**–डॉ. सविता काळेल,** अधीक्षक, चौक ग्रामीण रुग्णालय

**आम्ही माहितीच्या अधिकारात संपूर्ण माहिती घेतल्याने या रुग्णालयात जवळपास कर्मचाऱ्यांची ५० टक्के पदे रिक्त असल्याची गंभीर बाब आमच्या लक्षात आली असून या अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे रुग्णचिकित्सेवर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शासनाने या रुग्णालयाकडे लक्ष देऊन ज्या काही समस्या आहेत. त्याची लवकरात लवकर पूर्तता करावी.**

**–वसंत पाटील,** अध्यक्ष, माहिती अधिकार महासंघ

# ब्रेक फेल झाल्याने बोरघाटात एसटी मातीच्या ढिगाऱ्यावर; सुदैवाने जीवितहानी टळली

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गाहून लोणावळा येथून थांबा घेत खोपोलीकडे येत असताना, बोरघाटातील अंडा पॉईंट येथे पुणे-अलिबाग एसटीचा ब्रेक फेल झाला. चालकाने प्रसंगावधान राखून शेजारी असणाऱ्या मातीच्या ढिगाऱ्यावर चढवल्याने बस जागीच थांबली, अन्यथा बस खोल दरीत कोसळून मोठी दुर्घटना घडली असती. या घटनेने बसमधील प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला. ही घटना गुरुवारी (दि. ७) सकाळी ९ वा. सुमारास घडली.

बोरघाटातील अंडा पॉईंट येथे एसटी बस (एमएच २० बीएल ३०९०) वरील चालक पुणेकडून खोपोलीकडे जुन्या हायवेने जात असताना अंडा पॉईंट येथील वळणावर बसचा ब्रेक निकामी झाल्याने बसवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही बस मातीच्या ढिगाऱ्यावर चढून अपघात झाला. अपघातात कोणीही जखमी नाही.

दुसऱ्या घटनेत एलपीजी टँकरचा सेफ्टी व्हॉल्व लीक झाल्याने दुर्घटना होण्याची शक्यता गृहीत धरून महामार्ग वाहतूक पोलीस बोरघाट एपीआय योगेश भोसले, आयआरबीचे सेफ्टी इन्चार्ज पोपट शिंदे यांनी तातडीने अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे धनंजय गीध यांना घटनास्थळी पाचारण केले आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, महामार्ग वाहतूक पोलीस, खालापूर तालुका महसूल कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान, डेल्टा फोर्सचे जवान, खोपोली नगरपालिका अग्निशमन दलाची टीम, खोपोली पोलीस स्टेशनचे कर्मचारी आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या संयुक्त प्रयत्नातून मोठी हानी टळली.



# महाड येथे दिव्यांग मार्गदर्शन मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांचे मार्गदर्शनाखाली जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आमदार भरत गोगावले व दिव्यांग संघटना राज्याध्यक्ष साईनाथ पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्था, महाडच्या वतीने दिव्यांग मार्गदर्शन मेळावा कार्यक्रम झाला.

या मेळाव्यास निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष मिश्रा तसेच ग्रामीण रुग्णालय महाडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. भास्कर जगताप व सिकलसेल समुपदेशक प्रतिम सुतार, जिल्हा रुग्णालयासमवेत दिव्यांग कल्याणाच्या विविध शासकीय योजनांचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने अनेक शासकीय विभागातील अधिकारी उपस्थित होते. ९ डिसेंबर रोजी ग्रामीण रुग्णालय महाड,११ डिसेंबर रोजी ग्रामीण रुग्णालय श्रीवर्धन, तसेच १५ डिसेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे शिबिराचे आयोजन केले असून www.swavlambancard.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करून त्याची प्रत, आधारकार्ड, रेशनकार्ड, आधीच्या उपचारांची कागदपत्रे व दोन पासपोर्ट आकाराचे फोटोसहित उपस्थित राहावे, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

# पोलादूपर कोतवाल खुर्द येथे मृदा आरोग्य पत्रिका, सुपिकता कार्यक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रासायनिक खतांच्या अनिर्बंधित वापरामुळे जमिनीचा कस कमी होत आहे. त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. मातीचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी माती तपासणी पर्यायाने मातीच्या आरोग्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे काळाची गरज असल्याचे मत तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी व्यक्त केले.




पोलादपूर तालुका कृषी अधिकारी यांच्या वतीने जागतिक मृदा दिनी मृदा आरोग्य पत्रिका व सुपिकता कार्यक्रम कोतवाल खुर्द येथे साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी माजी सरपंच नामदेव तुकाराम शिंदे होते, तर प्रमुख मार्गदर्शक तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील, प्रगतशील शेतकरी नामदेव आप्पा शिंदे, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहाय्यक मनोज जाधव, अनिल डासाळकर, कृषी सहाय्यक अंजुम मोमीम, कृषी मित्र आदिनाथ सकपाळ व शेतकरी उपस्थित होते.

तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी मार्गदर्शन करतेवेळी माती परीक्षणामुळे जमिनीच्या सर्व गुणधर्माची माहिती मिळते. जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचे प्रमाण समजते आणि त्यानुसार रासायनिक खतांच्या मात्रा व शिफारशी ठरविणे सुलभ होते. माती आणि पाणी ही पिकांची संजीवनी आहे. पूर्वीच्या काळात सेंद्रिय पदार्थ जमिनीत साचण्याचे प्रमाण जास्त होते.साहजिकच जमिनीचा पोत टिकण्यास आपोआपच मदत होत असे. अन्नधान्याची गरज जसजशी वाढू लागली तसा जमिनीतून अधिकाधिक उत्पादन काढण्याकडे कल वाढत गेला. जमिनीचा खालावत चाललेला पोत हे आजच्या शेतीसमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघ २०१५ या वर्षापासून दरवर्षी ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिन म्हणून साजरा करीत आहे, अशी माहिती दिली.

या वेळी माती नमुना कसा काढावा याबाबत प्रात्यक्षिक कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी करून दाखविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी केले. आभार कृषी सहाय्यक अनिल डासलकर यांनी मानले.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या वतीने एड्स जनजागृती रॅली

**पेण : प्रतिनिधी**

वचन पाळा आणि एड्स टाळा असा नारा देत भाऊसाहेब नेने महाविद्यालय, सोबती ट्रस्ट, पेण महसूल विभाग, उपजिल्हा रुग्णालय पेण, डीएलएलई युनिट व एनएसएस युनिट, पेण प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनियर कॉलेज यांच्या सयुंक्त विद्यमाने एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीत ॲड. बापुसाहेब नेने, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, उपाध्यक्ष संजय कडू, प्राचार्य डॉ. सदानंद धारप, डीएलएलई युनिटचे रायगड जिल्हा समन्वयक डॉ. देवीदास बामणे व एनएसएस युनिटचे प्रमुख डॉ. टी. डी. माळवे, डॉ एस. डी.लकडे, प्रा. उदय मानकवळे, प्रा. सुंदर बनसोडे, मंदा पाटील तसेच महाविद्यालयातील विविध शाखांचे प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ही रॅली महात्मा गांधी मंदिर वाचनालय, चावडी नाका, हनुमान आळी, बाजारपेठ, शिवाजी चौक, पेण नगरपरिषद, उपजिल्हा रुग्णालय पेण येथून फिरत महाविद्यालयाच्या गेटजवळ रॅलीची सांगता करण्यात आली. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी एड्सबाबत विविध घोषणा देऊन जनजागृती केली, तसेच जनजागृतीपर माहितीपत्रकाचे वाटप केले.




# साजगाव यात्रेत झगमगाटासह गर्दी

**खोपोली : प्रतिनिधी**

साजगांव-ताकई येथे विठ्ठल मंदिर परिसरात कार्तिकी एकादशीपासून प्रसिद्ध बोंबल्या विठोबाची यात्रा सुरू आहे. सतत १५ दिवस चालणारी कोकण विभागातील ही एकमेव मोठी यात्रा आहे.



सुरुवातीचा आठवडा कमी गर्दीने निरुत्साही वातावरणात गेला, मात्र शनिवार व रविवारी सुट्टीच्या दिवसापासून दुसऱ्या आठवड्यात मात्र यात्रेत मोठी गर्दी होत आहे. शनिवार, रविवार या दोन दिवसांत विशेषतः रविवारी येथील व्यवसाय व आर्थिक उलाढालीला झळाळी प्राप्त झाली. यातही सौंदयप्रसादने दुकाने, खाऊगल्ली, मिठाई व मासळी बाजारात मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन येथे सर्वाधिक आर्थिक उलाढाल होत असल्याने व्यापारी वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे. या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात मालाची विक्री होऊन उत्तम आर्थिक उलाढाल झाली असल्याचे व्यापारी वर्गाने सांगितले. गर्दीचा हा उत्साह शेवटच्या दिवसापर्यंत कायम राहणार असून, यात्रेतील उंच उंच पाळणे, रोमहर्षक खेळ, खाऊगल्ली, खेळणी बाजार, मिठाई गल्ली व सुक्या मासळी बाजार सर्वांचे आकर्षण ठरत आहे. यात्रेत सहकुटुंब आलेली बच्चे कंपनी व तरुणांची प्रचंड गर्दी होत आहे. सुकीमासळीची खरेदी व खास आकर्षण असलेल्या गरमागरम जिलेबीचा अस्वाद खवय्यांकडून मनमुराद पणे घेतला जात आहे.

उत्तम व योग्य दरात चांगली सुकी मासळी येथे मिळत असल्याने साजगावची यात्रेत सुकी मासळी खवय्यांसाठी मोठी प्रवर्णी ठरते. खोपोली शहर, पनवेल, पाली सुधागड, पेण, खालापूर कर्जत तालुक्यातील व घाट माथ्यावरील हजारो कुटूंब व नागरिक या यात्रेत खास सुकी मासळी खरेदी करण्यासाठी येतात. यात्रेच्या शेवटच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात सुकी मासळी खरेदी केली जाते. दरम्यान, गर्दीच्या काळात कोणताही गैर प्रकार होऊ नये यासाठी खोपोली पोलीस, यात्रा कमिटी, खोपोली नगरपालिका प्रशासनाकडून सर्व खबरदारी घेण्यात येत आहे.

## माणगावात शिवसेना पदाधिकारी मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवसेना मुख्य नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने माणगावात कुणबी भवन सभागृह येथे रविवारी (दि. १०) शिवसेना दक्षिण रायगडचा पदाधिकारी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास आमदार भरत गोगावले, रायगड लोकसभा शिवसेना निरीक्षक मंगेश सातमकर, प्रदेश युवासेना सचिव कोकण विभाग विकास गोगावले आदी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

मेळाव्यास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुका प्रमुख ॲड. महेंद्र मानकर, युवासेना तालुका प्रमुख राजेश कदम, महिला संघटिका अरुणा वाघमारे यांनी केले आहे.

# अलिबागच्या थळ येथे आयुष्मान भव शिबिर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सामान्य रुग्णालय, ग्रुप ग्रामपंचायत थळ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि शंकरा आय केअर यांच्या सहकार्याने थळ बाजार येथे आयुष्मान भव अंतर्गत तपासणी शिबिर झाले.

या वेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या मानसी दळवी, पं. स. माजी सदस्य गजानन बुंदके, थळ ग्रामपंचायत सरपंच सुनील पत्रे, सदस्य विशाल बुंदके, नरेश कोळी, ग्रामसेवक नितेश तेलगे, मच्छीमार सोसायटीचे चेअरमन दिलेश चटके, प्रकाश पाटील आदी उपस्थित होते. या शिबिरासाठी जिल्हा रुग्णालयाचे पथक थळ जिल्हा परिषद शाळा येथे विद्यार्थी व ग्रामस्थांच्या तपासणीकरिता उपस्थित होते. या शिबिरांतर्गत १८ वर्षांवरील पुरुषांची तपासणी तसेच रक्ताची चाचणी, सिकलसेल, थायरॉईड, सीबीसी आदी चाचणी करण्यात आली. त्याचप्रमाणे शंकरा आय केअर यांच्यामार्फत मोतीबिंदू तसेच डोळ्यांच्या अन्य तपासणी करण्यात आल्या. मोतीबिंदू आढळलेल्या सात रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करण्याकरिता पनवेल येथे शंकरा आय केअरच्या मुख्यलयात नेण्यात आले.

आमदार महेंद्र दळवी यांच्या सहकार्याने लाभार्थ्यांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे जिल्हा रुग्णालयाच्या वतीने दिव्यांगांना साहित्याचे वाटप करण्यात आले, तसेच २१८ नागरिकांचे आयुष्मान कार्ड व ११२ नागरिकांचे आभाकार्ड काढण्यात आले, तसेच अवयवदान संकल्प पत्र भरण्याचे आवाहन करण्यात आले. या तपासणी शिबिरात सर्व विभागांतर्गत ४१० ग्रामस्थांनी लाभ घेतला.

शिबिराकरिता अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष मिश्रा यांचे सहकार्य लाभले. तपासणीकरीता वैद्यकीय अधिकारी डॉ. विकास पवार, डॉ. मोनिसा घोडके, एनटीसीपीचे सामाजिक कार्यकर्ते सुशील साईकर, डीईआयसी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदीप भोईर, नेत्र समुपदेशक अक्षय गोरे, सिकलसेल समुपदेशक प्रतिम सुतार, सिकलसेल प्रयोगशाळा तंत्रज्ञ दीपा म्हात्रे, एचएलएल प्रयोगशाळा तंत्रज्ञ रोहन रत्नाकर, अझहर, फार्मासिस्ट दीपेश घरत, आभाकार्ड डीइओ दर्शन पाटील आदी उपस्थित होते.

# पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात भारतीय महिला संघाची पिछेहाट

**मुंबई : प्रतिनिधी**

नॅट स्किव्हर-ब्रंट (५३ चेंडूंत ७७ धावा) व डॅनिएले वॅट (४७ चेंडूंत ७५ धावा) यांच्या आक्रमक फलंदाजीनंतर फिरकीपटू सोफी एक्लेस्टोनच्या (१५ धावांत ३ बळी) प्रभावी माऱ्याच्या जोरावर इंग्लंडच्या महिला संघाने पहिल्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात भारतावर ३८ धावांनी विजय मिळवला. या विजयाने इंग्लंडने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली आहे.

इंग्लंड संघाने प्रथम फलंदाजी करताना सहा बाद १९७ धावा केल्या. भारताला सहा बाद १५९ धावाच करता आल्या. मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर स्मृती मनधाना (६) लवकर माघारी परतली. मैदानात आलेल्या जेमिमा रॉड्रिग्जलाही (४) फार काही करता आले नाही. यानंतर सलामीवीर शफाली वर्मा (५२) व कर्णधार हरमनप्रीत कौर (२६) यांनी संघाचा डाव सावरला. दोघांनीही संघाच्या धावसंख्येत भर घातली, मात्र एक्लेस्टोनने कौरला बाद करीत भारताला मोठा धक्का दिला. मग रिचा घोषने (२१) शफालीच्या साथीने संघाचा डाव पुढे नेला. मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात ती बाद झाली. दरम्यान, शफालीने आपले अर्धशतक पूर्ण केले. ती बाद झाल्यानंतर कनिका अहुजा (१५) व पूजा वस्त्रकार (नाबाद ११) यांनी धावा केल्या.




इंग्लंडकडून एक्लेस्टोनला स्किव्हर-ब्रंट (१/३५), साराह ग्लेन (१/२५) यांची साथ मिळाली. त्यापूर्वी, प्रथम फलंदाजीस उतरलेल्या इंग्लंडची सुरुवातही चांगली झाली नाही. भारताच्या रेणुका सिंह ठाकूरने (३/२७) सोफी डंकली (१) व ॲलिस कॅप्से (०) यांनी बाद करीत इंग्लंडची अवस्था २ बाद २ अशी बिकट केली. या स्थितीतून वॅट व स्किव्हर-ब्रंट यांनी संघाला सावरले. दोन्ही फलंदाजांनी तिसऱ्या विकेटसाठी १३८ धावांची भागीदारी रचत संघाला सुस्थितीत पोहचवले. वॅटने आपल्या खेळीत आठ चौकार व दोन षटकार झळकावले, तर स्किव्हर-ब्रंटने १३ चौकार लगावले. या दोघी माघारी परतल्यानंतर एमी जोन्सने नऊ चेंडूंत २३ धावा करीत संघाला मोठया धावसंख्येपर्यंत पोहचवले. भारताकडून ठाकूरला श्रेयांका पाटील (२/४४) व सैका इशक (१/३८) यांनी चांगली साथ दिली.

**संक्षिप्त धावफलक**

*इंग्लंड : २० षटकांत ६ बाद १९७ (नॅट स्किव्हर-ब्रंट ७७, डॅनिएले वॅट ७५; रेणुका सिंह ठाकूर ३/२७, श्रेयांका पाटील २/४४) विजयी*

*भारत : २० षटकांत ६ बाद १५९ (शफाली वर्मा ५२, हरमनप्रीत कौर २६, रिचा घोष २१; सोफी एक्लेस्टोन ३/१५, साराह ग्लेन १/२५)*

# 'झुंझार'च्या क्रिकेट स्पर्धेत कामोठे संघाचा विजय

## तनिष्का वार्गे, पियुष दांडेकर यांची दमदार खेळी

**अलिबाग : प्रतिनिधी**

पोयनाड येथे झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित कै. मिलिंद रवींद्र चवरकर स्मृतिचषक एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीत अतिशय अटीतटीच्या झालेल्या सामन्यात करण क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने अलिबागच्या संघावर विजय मिळवला आहे.

अलिबाग संघाने नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. त्यांनी ४० षटकांत १९८ धावांची नोंद धावफलकावर केली. मधल्या फळीत तनिष्का वार्गे हिने दमदार फलंदाजी करीत ८८ चेंडूंचा सामना करून १४ चौकारांच्या सहाय्याने ७५ धावा ठोकल्या. मुलांच्या संघात एका मुलीने दमदार फलंदाजी केल्याने प्रेक्षकांनी तनिष्काचे कौतुक केले. तिला दुसऱ्या बाजूने सय्यद अहेमद यांनी ३८, अर्णव शिंदे यांनी १६ धावा केल्या. करण क्रिकेट अकॅडमीकडून पियुष दांडेकर याने चार व वेदांत शिंदे यांनी तीन फलंदाजांना बाद केले.

प्रत्युतरात करण क्रिकेट अकॅडमी संघांनी कडवी झुंज देत शेवटच्या षटकापर्यंत सामना नेला व अगदी शेवच्या चेंडूवर एक धाव काढत सामना जिंकला. पियुष दांडेकरने ४८, आर्यन पांडे २८, वेदांत शिंदे २१, लिला संघवीने १७ धावांचे योगदान दिले. अलिबाग संघाकडून ईशान काठे व ओम कवळे यांनी प्रत्येकी तीन फलंदाज बाद केले.



अष्टपैलू खेळी करणाऱ्या पियुष दांडेकरला सामनावीर, दामदार फलंदाजी करणाऱ्या तनिष्का वार्गे हिला स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू, सय्यद अहमद इमॅर्जिंग खेळाडू, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अर्णव पाटील, रिषभ बिश्वास यांना रायगड जिल्हा परिषदेचे उपशिक्षण विभागाचे अधिकारी सुनील भोपाळे, अलिबाग इंडस्ट्रियल हायस्कूलचे प्राध्यापक नितीन वार्गे, महाराष्ट्र महसूल रायगड विभागाचे कर्मचारी नागेश भगत, रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण विभागाचे समन्वयक संदीप वार्गे, मंडळाचे सचिव किशोर तावडे, अजय टेमकर, पंच अभिजित वाडकर, ॲड. पंकज पंडित, आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सामन्याच्या सुरुवातीला रायगड प्रीमियर लीग कमिटीचे अध्यक्ष राजेश पाटील यांच्या हस्ते नाणेफेक करण्यात आली. या वेळी त्यांनी कमिटीचे कौतुक करीत रायगड जिल्ह्यातील युवा खेळाडूंसाठी दरवर्षी १२,१४,१६ वर्षाखालील मुला-मुलींसाठी लेदरबॉल क्रिकेटच्या ४० षटकांच्या एकदिवसीय स्पर्धेचे आयोजन करून त्यांना प्रोत्साहन, व्यासपीठ आणि प्रसिद्ध देत असल्याचे सांगितले. अशा स्पर्धांमधूनच भविष्यात रायगड जिल्ह्याला गुणवान युवा खेळाडू मिळतील जे पुढे महाराष्ट्रासाठी खेळतील, असेही ते म्हणाले.

# दक्षिण आफ्रिका दौऱ्याआधी 'असा' असेल टीम इंडियाचा गेम प्लॅन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ दक्षिण आफ्रिकेत पोहचला आहे. राहुल द्रविडने पुन्हा एकदा पदभार स्वीकारल्यानंतर ही त्याची पहिली मालिका आहे. रोहितच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादव संघाचा कर्णधार आहे. या मालिकेबाबत द्रविडने दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांविरुद्ध भारतीय फलंदाजांचा दृष्टिकोन कसा असेल, यावर टीम इंडियाची योजना सांगितली आहे.

दक्षिण आफ्रिका दौऱ्यापूर्वी राहुल द्रविड म्हणाला की, आम्ही उसळत्या चेंडूच्या खेळपट्टीवर गोलंदाजांचा कसा सामना करावा, याचा सराव करीत आहोत. फलंदाजीसाठी आफ्रिकेतील खेळपट्ट्या या आव्हानात्मक आहेत. याविषयीचे आकडे तुम्हाला माहित असतीलच. इथे फलंदाजी करणे खूप कठीण आहे. खासकरून सेंच्युरियन आणि जोहान्सबर्ग ही ठिकाणी चेंडू अधिक उसळी घेतो, त्यांच्या खेळपट्टीत सतत बदल होत राहतो. त्यामुळे प्रत्येक फलंदाजाकडे आपली एक योजना असेल की, त्यांना कशाप्रकारे पुढे जायचे आहे.

# भर सामन्यात गंभीर आणि श्रीसंत भिडले; व्हिडीओ व्हायरल

**सुरत : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी स्फोटक सलामीवीर गौतम गंभीर सध्या लिजेंड्स लीग क्रिकेटमध्ये इंडिया कॅपिटल्सचे नेतृत्व करीत आहे. या टूर्नामेंटमध्ये गंभीरची बॅट धावांचा पाऊस पाडत आहे. गुजरात जायंट्स आणि इंडिया कॅपिटल्स यांच्यातील पहिला एलिमिनेटर सामना अतिशय रोमांचक झाला. सुरतमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात गुजरात जायंट्सकडून खेळणारा गौतम गंभीर आणि टीम इंडियाचा माजी वेगवान गोलंदाज श्रीसंत यांच्यात वाद झाला. दोघांतील शाब्दिक वादाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

लालाभाई कॉन्ट्रॅक्टर स्टेडियमवर झालेल्या एलिमिनेटर सामन्यात गुजरात जायंट्स आणि इंडिया कॅपिटल्सचे संघ आमनेसामने होते. सामन्याच्या दुसऱ्या षटकात गौतम गंभीर स्ट्राइकवर असताना ही घटना घडली. एस. श्रीसंत पहिले षटक टाकण्यासाठी आला होता. गंभीरने पहिल्याच चेंडूवर षटकार मारला. त्यानंतर पुढच्या चेंडूवर चौकार मारला. पुढचा चेंडू डॉट होता. यानंतर श्रीसंत पुढे गेला आणि गंभीरकडे पाहू लागला. मग गंभीरनेही श्रीसंतला चोख प्रत्युत्तर दिले, मात्र प्रकरण फार पुढे न घेऊन जाता दोघेही शांत झाले. श्रीसंतने तीन षटकांत ३५ धावा देऊन एक विकेट घेतली.



सामन्याबद्दल बोलायचे झाले, तर गौतम गंभीरच्या नेतृत्वाखाली इंडिया कॅपिटल्सने गुजरात जायंट्सचा १२ धावांनी पराभव केला. गंभीरने ३० चेंडूंत सात चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने ५१ धावांची खेळी केली. इंडिया कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना ७ बाद २२३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात ख्रिस गेलच्या ८४ धावांच्या खेळीनंतरही गुजराजच्या संघाला विजयाची नोंद करता आली नाही. केविन ओब्रायनने ३३ चेंडूत ५७ धावांची खेळी केली. रस्टी थेरॉन आणि ईश्वर पांडे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

# फाफ डु प्लेसिसने करणार पुनरागमन

**केपटाऊन : वृत्तसंस्था**



भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात टी-२०, एकदिवसीय आणि कसोटी मालिका होणार आहे. यासाठी टीम इंडियाचा टी-२० संघही आफ्रिकेत पोहचला आहे. पुढील वर्षी टी-२० विश्वचषकही खेळवला जाणार आहे. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू फाफ डुप्लेसिसने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याबाबत अपडेट दिले आहे.

दक्षिण आफ्रिकेचा अनुभवी खेळाडू डु प्लेसिसने २०२१मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली, मात्र त्यानंतरही तो इंडियन प्रीमियर लीगमध्ये खेळताना दिसत आहे. सध्या त्याच्याकडे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची कर्णधारपद आहे. आता फक्त काही महिने आयसीसी टी-२० विश्वचषकाला उरले आहेत. आफ्रिकेचा फलंदाज फाफ डू प्लेसिसने पुनरागमनाचे संकेत दिले असून आफ्रिकन संघासाठी ही एक मोठी घडामोड आहे.

फाफ डु प्लेसिसने एका मुलाखतीत सांगितले की, मला खात्री आहे की, मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करू शकेन. आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून याबद्दल बोलत आहोत. मी पुढील वर्षी होणाऱ्या आयसीसी टी-२० विश्वचषकासाठी फलंदाजीतील समतोल राखण्याचा प्रयत्न करत आहे. मी संघाच्या नवीन प्रशिक्षकाबरोबर पुनरागमन करण्याबाबतही बोललो आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्यासाठी मी खूप मेहनत घेत आहे. मी माझ्या फिटनेसवर काम करीत आहे, जेणेकरून मला चांगले क्रिकेट खेळता येईल.

तो पुढे म्हणाला, तुमचे वय जसजसे वाढत जाते तसतसे तुम्हाला तुमच्या फिटनेसवर अधिक मेहनत करावी लागते. वाढत्या वयामुळे हॅमस्ट्रिंग आणि शरीराचे इतर अवयवदेखील काम करू शकत नाहीत. अशा स्थितीत तंदुरुस्त राहण्यासाठी एक उत्तम गोष्ट आहे. शारीरिक संतुलन राखणे आवश्यक आहे. डु प्लेसिसने केवळ कसोटीतूनच निवृत्ती घेतली आहे. २०१९मध्ये तो शेवटचा टी-२० क्रिकेट खेळला होता, मात्र तेव्हापासून तो केवळ परदेशी आणि देशांतर्गत लीग खेळला आहे आणि तिथे त्याने चमकदार कामगिरी केली आहे.

**आयपीएलमध्ये अप्रतिम कामगिरी**

आयपीएलच्या गेल्या दोन मोसमात फाफ डू प्लेसिसने कर्णधार म्हणून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूमध्ये आश्चर्यकारक कामगिरी केली आहे. गेल्या दोन हंगामात फॅफच्या बॅटमधून ११९८ धावा झाल्या आहेत. जर आपण २०२३च्या हंगामाबद्दल बोललो, तर त्याने १४ सामन्यांमध्ये ७३० धावा केल्या, ज्यात आठ अर्धशतकांचा समावेश आहे. आपण आंतरराष्ट्रीय टी-२० फॉरमॅटमध्ये कर्णधार म्हणून डु प्लेसिसची आकडेवारी पाहिली तर त्याने ४०पैकी २५ सामने जिंकले, तर १५मध्ये पराभवाचा सामना करावा लागला.

# भारत-पाकिस्तान पुन्हा भिडणार

## अंडर-१९ आशिया चषकात रविवारी सामना



**मुंबई : प्रतिनिधी**

आता पुन्हा, १० डिसेंबरला म्हणजे तीन दिवसांनंतर भारत आणि पाकिस्तानचे क्रिकेट संघ पुन्हा एकदा मैदानात आमनेसामने येतील. पुरुष अंडर-१९ आशिया चषकाला सुरुवात होत आहे, ज्यामध्ये रविवारी (दि.१०) भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना पाहायला मिळणार आहे. उदय सहारन या स्पर्धेत भारताचे नेतृत्व करणार आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना दुबईतील आयसीसी ॲकॅडमी ओव्हलवरील पहिल्या क्रमांकाच्या मैदानावर होणार आहे. आठ संघांच्या अंडर-१९ आशिया चषकामध्ये भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि जपान या संघांचा समावेश आहे. या संघांची 'अ' आणि 'ब' अशा दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. या गटात भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि नेपाळ या संघांचा समावेश आहे.

उल्लेखनीय आहे की विश्वचषक २०२३मध्ये अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि पाकिस्तानच्या वरिष्ठ संघांमध्ये सामना झाला होता. टीम इंडियाने सात विकेट्सने आरामात विजय मिळवला.

# स्नेहल माळीला राष्ट्रीय नॅशनल ट्रक स्पर्धेत सिल्व्हर मेडल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रांची, झारखंड येथे झालेल्या ५२व्या राष्ट्रीय ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत स्नेहल शत्रुघ्न माळी हिने सिल्व्हर पदक पटकविले.

या स्पर्धेतील सहभागी हे सर्व राज्य विजेते, भारतीय रेल्वे, संरक्षण सेवा, आशियाई खेळ, स्पोर्ट्स अथॉरिटी इंडिया, खेलो इंडिया खेलो येथील होते. या सर्वांमध्ये स्नेहल माळीने रौप्यपदक पटकावले आहे. स्नेहलचे राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत तिसरे पदक असून कुरुक्षेत्र येथे सुवर्णपदक, पनवेल येथे कांस्यपदक आणि रांची येथे सिल्व्हर पदक पटकाविले आहे.

स्नेहल ही रसायनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांची कन्या आहे. तिला फेडरेशनचे उपाध्यक्ष प्रताप जाधव, महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे साठे सर, जिजामाता पुरस्कार विजेती दिपाली निकम, शिवछत्रपती पुरस्कार विजेती दिपाली शिळदणकर आणि ती सध्या सराव करत असलेले महाराष्ट्र टिम प्रशिक्षक दर्शन बारगुजे (फिनिक्स सायकलिंग केडमी पुणे) यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

स्नेहलच्या या यशामागे प्रशिक्षक व विशेष करून तिची आई व वडिलांचा सिंहांचा वाटा आहे. स्नेहल शत्रुघ्न माळी हिने राष्ट्रीय नॅशनल स्पर्धेत सुयश संपादन केल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# हरमनप्रीतचा वर्ल्ड रेकॉर्ड; दिग्गजांना टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघ मायदेशात इंग्लंडविरुद्ध तीन सामन्यांची ट्वेंटी-२० मालिका खेळत आहे. इंग्लिश संघाने ३८ धावांनी पहिला सामना आपल्या नावावर केला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील भारताला पराभव स्वीकारावा लागला असला तरी भारतीय कर्णधाराने इतिहास रचला आहे. कर्णधार म्हणून हरमनने १०१ वा ट्वेंटी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला तसेच महिला क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामन्यांत कर्णधारपद सांभाळणारी ती पहिली खेळाडू ठरली आहे.

सलामीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना इंग्लिश संघाने निर्धारित २० षटकांत १९७ धावा केल्या. १९८ धावांच्या तगड्या आव्हानाचा पाठलाग करताना यजमानांना मात्र घाम फुटला अन् पराभव पत्करावा लागला. प्रत्युत्तरात भारतीय संघ सहा बाद केवळ १५९ धावा करू शकला.




भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील १०१वा ट्वेंटी-२० सामना बुधवारी वानखेडे स्टेडियमवर झाला. हरमनप्रीत ही भारतीय कर्णधार म्हणून सर्वाधिक ट्वेंटी-२० सामने खेळणारी खेळाडू ठरली आहे. या बाबतीत तिने ऑस्ट्रेलियाच्या मेग लॅनिंगला मागे सोडले आहे, जिने क्रिकेटच्या या लहान फॉरमॅटमध्ये १०० सामन्यांमध्ये कांगारूच्या संघाचे नेतृत्व केले.

दरम्यान, हरमनप्रीत कौरने जो पराक्रम केला आहे तो आजतागायत कोणत्याही पुरुष क्रिकेटपटूने ट्वेंटी-२०मध्ये केलेला नाही. आरोन फिंचने आंतरराष्ट्रीय ट्वेंटी-२०मध्ये एकूण ७८ सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियन संघाचे नेतृत्व केले आहे. यानंतर दुसऱ्या क्रमांकावर माजी भारतीय कर्णधार महेंद्रसिंह धोनीचा नंबर लागतो, ज्याने ७२ सामन्यांमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व केले आहे.

## आंबेकर स्मृती कॅरम स्पर्धा

# मायकल, नारायण गुरु हायस्कूल विजयी

**मुंबई : प्रतिनिधी**

कामगार महर्षी स्व. गं.द. आंबेकर स्मृती चषक आंतरशालेय सुपर लीग कॅरम स्पर्धेतील पूर्व मुंबई विभाग प्राथमिक फेरीत कुर्ल्याच्या मायकल हायस्कूल मुली, चेंबूरच्या नारायण गुरु हायस्कूल आदी संघांनी पहिला साखळी विजय मिळविला.

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व राष्ट्रीय मिल मजदूर संघ आयोजित चेंबूर येथील विभागीय शालेय स्पर्धेमध्ये मायकल हायस्कूल मुलींच्या संघाने कुमुद विद्या मंदिरला २-१ असे तर नारायण गुरु हायस्कूलने मुलांच्या मायकल हायस्कूलला २-१ असे चकविले. सिद्धार्थ सावंतने फातिमा खानचा १९-० असा पराभव करून मायकल हायस्कूल विरुद्ध कुमुद विद्या मंदिरला १-० अशी आघाडी मिळवून दिली, परंतु दुसऱ्या एकेरीत असमिया शेखने प्रज्वल शिवगणचा १५-१४ असा पराभव करून मायकल हायस्कूलला १-१ अशी बरोबरी साधून दिली. निर्णायक एकेरीच्या सामन्यात नौशीन शाहने मयांक पवारचे आव्हान १०-४ असे संपुष्टात आणून मायकल हायस्कूल-मुली संघाच्या विजयावर २-१ असा शिक्कामोर्तब केला.

दुसऱ्या सामन्यात उमर पठाणने शुभम परमारवर १२-० असा तर शाहीद खानने गंधर्व नारायणकरवर ८-२ असा विजय मिळविल्यामुळे नारायण गुरु हायस्कूलने मायकल हायस्कूलला २-१ असे नमविले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com